प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे

**''दारु कशी पितात रे भाऊ ?'' अर्थात मद्यपानाची आचारसंहिता**

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

---

<u>उपहास म्हणजेच विडंबन लेख</u>

|| अखिल ब्रह्माण्ड संस्कृतिवर्णजातधर्मस्थलकालनिरपेक्ष मोक्षदायिनी सुरादेवी प्रसन्न ||

|| सुरामेव जयते नानृतम् ||

|| सुरान् पन्था विततो देवगृहयानः ||[1]

*अर्पण लाईन्स :*

*1)''एकच प्याला'' निर्माण करणाऱ्या राम गणेश गडकरी मास्तरार्पणमस्तु !!*

*2)"माझ्या नवऱ्यानं सोडलीया दारु बाई देव पावलाय गं''गाणाऱ्या रोशन सातारकरला !*

आणि

*3) हे गाणं लिहिणाऱ्या लोककवी वामनदादा कर्डक यांना.*

## ''दारु कशी पितात रे भाऊ?''

अर्थात

## मद्यपानाची आचारसंहिता

-- श्रीनिवास हेमाडे

(लेखाचे Preamble[2] : तीर्थस्वरुप अण्णाराव हजारेसाहेब ( तेच ते *वाकड्या तोंडाचे गांधी !* कंस 'सांगा बरे कोण म्हणाले असे प्रश्नचिन्ह कंस संपला. उत्तर - महाराष्ट्रातील पुन्हा कंस महाराष्ट्रातील नव्हे तर देशातीलच पुन्हा कंस संपला एकमेव 'एक था टायगर !' ), डॉ. नरेंद्रमहाराज दाभोळकर -- सातारकर आणि साक्षात मद्यासक्ति मोक्षदाते व ' मुक्तांगण ' साठीचे 'मुक्ता' दाते बाबामहाराज पुणेकर उपाख्य डॉ.अनिलराव अवचट साहेब यांची सपशेल (स्पेशल ) माफी मागून आणि *'अल्कोहॉलिक ॲनॉनिमस', 'मुक्तांगण ' , 'विपस्सना केंद्रां' सारखी महाराष्ट्र देशीची व देशीचीच (पहा अखेर देशीवादच खरा) व एकूणच समस्त जगतातीलच पब्लिक आणि समस्त प्रायव्हेट लि.व्यसनमुक्तीकेंद्रे बऱ्यापैकी बंद पडावीत* ही जरा जास्तच भारदस्त पण अतिशय असंभाव्य, प्लेटोनिक, अफलातून व अद्भूत सदिच्छा व्यक्त करुन हा लेख [ नशापाणी न करता , जागेपणी , दिवसाढवळ्या] लिहीत आहे.)

<u>विशेष सूचना</u> :

(1)लेखातील सर्व नियम भ्रष्टाचार, वेश्याव्यवसाय, अश्लीलसाहित्यनिर्मिती उद्योगइत्यादींना सुध्दा लागू करता येईल असा जरा जास्तच आगाऊ विश्वास अस्मादिकांस वाटतो.

---

[1] अ) मूळ वैदिक विधान : "सत्यमेव जयते नानृतं । सत्येन पन्था विततो देवयानः । येनाक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत् सत्यस्य परमं निधानम् ॥ " (मुंडक उपनिषद- ३.१.६) याचा अर्थ होतो – 'सत्याचाच जय होतो, असत्याचा नाही. सत्याचा मार्ग हा दिव्यमार्ग (म्हणजे देवांनी निश्चित केलेला देवयान) आहे. स्वतःच्या कामनापूर्ती झालेल्या ऋषींनी (हा जो दिव्यमार्ग) स्वीकारला तेच खरे सत्याचे सर्वोच्च स्थान आहे. या विधानाला ब्रीदविधानाचा राष्ट्रीय दर्जा देण्याचे काम पंडित मदन मोहन मालवीय यांनी इ.स. १९१८ मध्ये केले. ब्रीदविधान या शब्दाचा आजचा समकालीन शब्द आहे Mission Statement.

ब) वरील बदललेल्या विधानाचा अर्थ : *माणसाची अखेर होण्यातच दारूचा विजय आहे आणि म्हणून जो दारूच्या चालीने चालतो तो अखेरीस देवाघरीच जातो!*

[2] Preamble म्हणजे सुध्दा दारु. फक्त जेवणाआधी गंमत म्हणून घेतलेली एका पेगपेक्षा जास्त पण पिदोड्या, बेवड्या पदापर्यंत न जाणारे मद्यसेवन .

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

(2)लेखाचे वाचन करताना वाचकाने व वाचकीने "मीच (म्हणजे श्रीनिवास हेमाडे नव्हे तर वाचणारा जो कुणी किंवा जी कुणी असेल तिने )हे सगळे "आपण कुणाला तरी सांगत आहोत, कुणाशी तरी बोलत आहेत" ' अशा पध्दतीने म्हणजे प्रथम पुरुषी एकवचनी वाचावे .(वाचकीने प्रथमस्त्री एकवचनी ) मनातल्या मनातच स्वतःला व्यवस्थित ऐकू येईल , एवढ्या मोठ्या आवाजात वाचावे. आणि इतरांना वाचून दाखविताना त्यांना ऐकू जाईल एवढ्याच मोठ्या आवाजात,त्यांची प्रतिक्रिया लक्षपूर्वक ऐकून - बघून , आवश्यक वाटल्यास अधेमधे किंचित थांबून वाचावे .सूचना संपली .

**(3)वाढीव सूचना** : लेख वाचताना व ऐकतानाही 'बसून' म्हणजेच थोडीशी किंवा थोडी जास्त घेण्यास' हरकत नाही. मजा येईल.



आता लेखाकडे, - -

## उपोद्‌घात

सांप्रतच्या काळी या दगडाधोंडाविटांच्या (म.वा.धोंड,धोंडो विठ्ठल व अलिकडचे फारुख धोंडी यांच्यासहच्या ) महाराष्ट्रदेशी 'दारु' या एकमेवाद्वितीय विषयावरुन बऱ्यापैकी गदारोळ झाला.महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर व सध्याच्या राज्याचे सध्याचे उत्पादन शुल्क व पर्यावरण मंत्री गणेश नाईक यांच्यातील चर्चेने महाराष्ट्रातील राजकीय व सांस्कृतिक पर्यावरण ढवळून निघाले.दोघांच्याही भूमिका शास्त्रीय दृष्टिकोनाच्याच आहेत. दाभोळकरांचा वाद तात्विक आहे,व्यापक समाजहिताचा व अतिआदर्शवादी (बराचसा अवास्तववादी ) आहे तर राजसत्ताधिकारी असलेले नाईक समाजातील एक कठोर (पण नशीले ) अतिवास्तववादी चित्र समोर मांडणारा आहे. याचा अर्थ दाभोळकरांची भूमिका ' तत्त्वशास्त्रीय ' ( Philosophical )आहे तर नाईकांची भूमिका 'सत्ताशास्त्रीय ' ( Powerful ) आहे. नाईक यांचे 'साहेब ' व शेतकऱ्यांचा राजा उर्फ 'राष्ट्रवादी' कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही दारु व वाईन हे पदार्थ वेगवेगळे असून वाईन ही दारु नसल्याचेच प्रतिपादन नुकतेच केले आहे. त्यांचेच अन्य एक सत्ताशास्त्रीय मंत्री पतंगराव कदम यांनीही या दोघांच्या मायंदाळ आधीच वाईनचे गुणगान सुरु केल्याचे आपणा सगळ्यांना चांगलेच माहित आहे. 'वाईन पार्क, मोसंबी नारंगी पार्क, व्हिस्की-रम-बियर पार्क' सुरु करण्याची अभिनव मदमस्त कल्पनाही काही जाणकारांकडून मांडण्यात येत आहे. काही वर्षापूर्वी आपल्या या महाराष्ट्र शासनाने किराणा दुकानात बियर विकण्यास परवानगी देणारा क्रांतिकारी व बंडखोर विचार मांडला होताच.तिच्या जोडीला आता वाईनही आली आहे. मद्यपानाला असलेले शासकीय अधिष्ठान (चळवळींच्या भाषेत) अधोरेखित झाले आहे.त्यामुळेच दारुविषयक आचारसंहितेची गरज आहे , यात शंका नाही ! ती कशी असू शकते ,याचा हा एक प्रयत्न. अर्थात यातील जाणकार आणि याविषयाविषयी जिव्हाळा ( व ढेरेदार पोटाळा ) असणारे त्यात (त्यांच्या कोट्यानुसार) कमीजास्त भर घालू शकतील.

---

आता खरेच लेखाकडे, ----

दारु कशी पितात ? हा प्रश्न बऱ्याचजणांना बऱ्याचअंशी बराचसा असभ्य, अशिष्ट वाटेल, यात मला कसलीही कुशंका नाही. कारण असा प्रश्न विचारणे प्रचलित नीतीसंकेतांना धरुन नाही.शिवाय "कशी प्यावी काय? " त्यात काय डोंबलं विचारायचयं ? ती डायरेक्ट करण्याचीच गोष्ट आहे, चर्चा करण्याची नाही, असं या क्षेत्रातील मुरलेल्या लोणच्यासारख्या अनेक मातब्बर अन् सिनीअर सिटीझनांचं म्हणजेच 'पितामहां ' चं म्हणणं (पिण्यापूर्वी, प्यायल्यानंतर आणि न पिताही )असतं.

प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे

**"दारु कशी पितात रे भाऊ ?" अर्थात मद्यपानाची आचारसंहिता**

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



दारुपान हा जीवन जगण्याचा एक भाग आहे, अर्थातच ऐच्छिक आहे ,ती रुढी आहे, संकेत आहे, ती एक परंपरा आणि संस्कृती आहे. तिला धर्ममान्यताही आहे; एवढेच नव्हे तर 'मद्य' हा स्वतः एक खरा 'स्वयंकुंभ' ('स्वयंभू' च्या धर्तीवर) धर्म आहे.सर्वच प्रकारच्या ओळखी - अनोळखी,छोट्यामोठ्यांना माणसांना जवळ आणणारा, विषमता दूर करुन भेदभाव नष्ट करणारा, सर्व मानवी जीवजंतूमध्ये मैत्रभाव निर्माण करणारा तो द्रुतगती महामार्ग आहे. मद्य हाच 'खरा तो एकचि धर्मनिरपेक्ष धर्म ' आहे. त्यामुळे मानवी जीवनाचा सर्वांगीण विचार करताना मद्यसंस्कृतीचा विचार आवश्यक ठरतो.

मद्य हे जीवनातील 'आवश्यक बनवले ' गेलेले दुरित (necessary evil but not essential evil ) आहे. पृथ्वीच्या कुशीत जन्मलेल्या कोणत्याही मानववंशाच्या कितीही पराक्रमी चक्रवर्ती सम्राटापासून ते मुंबईत रात्रीबेरात्री बारांवर छापे मारणाऱ्या श्री.सिध्दराम म्हेत्रे या महाराष्ट्रीय राज्यमंत्र्यापर्यंत कोणालाहीला 'दारु जगातून नष्ट करणे ' अथवा 'अरबी समुद्रात बुडविणे कधीही जमलेले नाही , जमणार ही नाही.(त्यांना फार फार तर सरकारी अथवा व्यक्तिगत स्वरुपाचा कर वाढविता येईल ! )त्यामुळे दारुचा खुल्या मनाने (व खुल्या गळ्याने,खुल्या खिशाने ) व उदारमतवादी दृष्टिकोनाने (प्रसंगी उधारमतवादी दृष्टिकोनाने = क्रेडिट कार्डाने ! ) स्वीकार केलाच पाहिजे; जसे आता आपण जागतिकीकरणाचे करीत आहोत.भाषेच्याच भाषेत बोलावयाचे ' दारु ही खरी जागतिक भाषा आहे '. चर्चाविश्वाच्या परिभाषेत बोलावयाचे तर ' जगातील कोणत्याही आयडियालॉजीपेक्षा तिचेच खरे जागतिकीकरण झाले आहे !! '

पण दुदैवाने उच्च दर्जाच्या पवित्र , सुजलाम सुफलाम भारतीय संस्कृतीत दारुविषयक चर्चा करणं बसत नाही (पण 'बसणं ' कधीही चालतं ). समानशीलेषु मित्रमंडळींमध्येच काय त्या या विषयीच्या चर्चा होतात , घरात चर्चा होणं अम्मळ (अंमल म्हणायला पाहिजे खरं तर! ) कठिणच.खरे तर प्राचीन पवित्र वैदिक भारतात दारुला अतिशय प्रतिष्ठा होती , तो जणू एक धार्मिक विधी होता.एका धर्मकार्यातूनच दारुचा जन्म झाला आहे.ते पुढे बघूच आपण .

तर <u>दारु कशी प्यावी ?</u> या प्रश्नाचे उत्तर म्हणून -

1. गटगटगटगट प्यावी किंवा गटागटा प्यावी
2. गटागटांनी मिळून प्यावी
3. आरामात , सावकाश, घाई न करता प्यावी . लवकरात लवकर घाईने पिवून टाकून मोकळे व्हावे.
4. पाणी, सोडा ,पेप्सी इत्यादी मिसळून प्यावी .
5. खरी चव चाखायची असेल तर काहीच न मिसळता कच्चीत मारावी.
6. संध्याकाळी प्यावी कधीही प्यावी : सायंकाळ ,दुपार ,सकाळ ,सूर्योदय , सूर्यास्त ; अशी येडपट विषमता पाळू नये
7. ग्लासातून किंवा थेट बाटली तोंडाला लावून प्यावी (" दारुला तोंड देखील लावत नाही ", असे म्हणताही येते व पिताही येते)
8. कुणी पाजत असेल तर प्यावी .
9. कुणी पाजत असेल तर आणि तरच प्यावी ( असे दारुकाम जनरली रावसाहेब,भाऊसाहेब इत्यादी सर्वनामांनी ओळखले जाणारे तलाठी, तहसीलदार, मामलेदार पीडब्ल्यूडी किंवा गेलाबाजार उपनिबंधक इत्यादी सरकारी कार्यालयातील आणि कर्ज मंजूर करणाऱ्या वित्तसंस्था, बँका इत्यादीमधील लोकांचे असते.पत्रकारांचेही तसेच असते, असे म्हणतात !
10. निदान गावपातळीवरच्या पत्रकारांचे तर तस्सेच असते, अशी चर्चा आहे ; असे ऐकिवात आहे.)
11. नेहमी बाहेरच प्यावी (आईची, बायकोची साली कटकट नको )
12. नेहमी घरी प्यावी ( त्यांची साली कटकट झाली तरी स्वस्त पडते ! )
13. सडाफटिंग असेल त्यांनी रुमवर प्यावी .

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

14. मित्राबरोबर प्यावी (मैत्रिण असेल तर उत्तमच, उत्तम मैत्रिण असेल तर फाफ्फार उत्तमोत्तम !!!!!!)
15. . .. .. .. .. .. ..
16. . .. .. .. .. .. .. .. .. . . . .

अशी विविध उत्तरे मिळतात. शुध्दिवर असणाऱ्या ( किंवा / आणि स्त्रीमुक्तिवादी असणाऱ्या ) सर्वांच्या चाणाक्षपणे हे लक्षात आलेच असेल,की ही सगळी उत्तरे ' पुरूषतंत्री ', ठार MCP अर्थात Male Chauvinist Pig - भाषांतर - ***पुरुषप्रधान डुक्कर*** छाप म्हणजेच 'पु. प्र. डु' छाप आहेत.कारण मद्यपान हा आपल्या सध्याच्या शुर्चिभूत पवित्र सनातन पारंपरिक संस्कृतीत केवळ पुरुषांचाच मक्ता आहे.[3]



माझ्या निरीक्षणानुसार व माझ्याच प्रामाणिक मतानुसार (मत हे नेहमी प्रामाणिकच असते )दारुकाम करण्याचे काही नियम तयार करता येतील.त्याची काही एक आचारसंहिता किंवा निदान पूर्वप्राथमिक स्वरुपाचे नीतीशास्त्र बनविता येईल.ही सुरुवात असून त्यात अनुभवसंपन्न व ज्येष्ठ नागरिक भर घालू शकतील .या आचारसंहितेची कच्ची सुरुवात पुढीलप्रमाणे करता येईल.नंतर तिला चांगले पक्के स्वरुप आपोआपच प्राप्त होईल.तेंव्हा .. ..

## [A]दारुपानाचे पध्दतीशास्त्र (methodology)

कोणत्याही विषयवस्तुचा अभ्यास करावयाचा , ती अंगी बाणवावयाची असेल तर तिचे पध्दतीशास्त्र , संशोधन पध्दती, दिशा, मर्यादा व उद्दिष्टे इ. ठरविण्याची पध्दती असते. त्यानुसार दारुपानाचे पध्दतीशास्त्र पुढीलप्रमाणे सांगता येईल :

### अ) प्रथम शासकीय परवाना मिळविणे .

पहिला प्याला पिण्यापूर्वीच म्हणजेच 'तळीराम 'चे जनक असलेल्या राम गणेश गडकऱ्यांच्या भाषेत 'एकच प्याला' पिण्यापूर्वीच , सर्वात आधी राज्य शासनातर्फे दारु पिण्यासाठी देण्यात येणारा परवाना मिळवावा.परवाना फी ? एका लार्ज पेगच्या किंमतीएवढीच ! रु.100=00 फक्त .कंसात रुपये शंभर ! ( आपण महाराष्ट्रात राहत असल्याने आपण महाराष्ट्र शासनाचा परवाना मिळवावा.इतर राज्यातील दारुप्रेमींनी त्यांच्या राज्याचा मिळवावा.त्यांच्याही राज्यात असे परवाने मिळतात ! )परवान्यामुळे दारु पिण्याला कायदेशीरच *वैधव्य (validity)* प्राप्त होते. या परवान्यामुळे दारुकाम करताना पोलिस अटक करु शकत नाहीत. कायद्यानुसार दारु पिण्यासाठी, बाळगण्यासाठी, वाहून नेण्यासाठी परवान्याची गरज असते.बहुतेक दारुप्रेमींना याची माहिती नसते.( असली तरी ते हा परवाना मिळविण्याचा आळस करतात.वाहनाच्या परवान्याप्रमाणेच प्रत्येकाने हा परवाना अनिवार्यतेने काढलाच पाहिजे.)खरे तर तुम्ही कोणत्या कारणासाठी दारुकाम करता यापेक्षा कायदेशीररित्या पिता की नाही, हाच मुद्दा महत्वाचा असतो.(शासनाला कायदाच महत्वाचा वाटतो , नीती दुय्यम ).कायदेशीर वैधव्य हे शासनाच्या दृष्टिने हे राज्यात दारु असण्याचे एकमेवाद्वितीय कारण .आणि राज्यातील नागरिकांनी दारु पिण्यामागचा सद्हेतू म्हणजे आरोग्याचे रक्षण ! (**चौकट क्र. 1 वाचावी** ) दारुकामामागे एवढे वैदयकशास्त्रीय व सार्वजनिक आरोग्य रक्षणाचे हेतू असलेले सरकार किती उदात्त आहे पहा ! त्यामुळे हा परवाना मिळविताना संकोचू

---

[3]अर्थातच हे खरे आहे .कारण या लेखाचे शीर्षकच मुळी ' दारु कशी प्यावी रे भाऊ ? ' असे ठेवले आहे (व दयाळू संपादकांनी ते बदलेले नाही ! )ते शीर्षकही पुरुषतंत्रीच आहे,बंधुभाव व्यक्त करणारे आहे. विनोदश्री पु. लं.च्या 'वाऱ्यावरची वरात ' मधील हा संवाद ज्यांच्या तोंडी आहे ते वऱ्हाडीही अल्पवयीन असले तरी 'पुरुषच ' आहेत. उगाच काही पु.लं. नी ही वाक्ये पुरुषाच्या तेंडी नाही घातली ! पु. ल.नां स्त्रियांच्या तोंडी (दारु नाही पण ) ही वाक्ये तरी घालता आली असतीच ना !? पण ते बिचारे (गेले ! ) तरी करणार काय ? तेही ' पु.प्र.डु.' च्या अमलाखाली होते. ते समतावादी होते खरे, त्यांनी खरे तर "दारू म्हणजे काय गं ताई?" असे लिहायला हवे होते. असो. म्हणजेच नसो!! कारण समाजात जे दिसते तेच लेखक लिहीणार ना ? दारु हा स्त्रियांचा प्रांतच नव्हे , असे समजले जाते .हा अर्थातच घनदाट गैरसमज आहे, हे अनेक स्त्रियांनी सिद्ध केले आहे. यासंबंधात विश्लेषण व अधिकाधिक माहिती याच लेखात पुढे येईलच.

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरुन संपर्क : 9226563052

नये. हा परवाना म्हणजे माणसाच्या मद्यजीवनाच्या पायाचा दगड आहे . ते काम प्लींथपर्यंत आले की पुढची नशील्या जीवनाची इमारत भक्कम उभी राहते .मधे मधे पाणी मारावेच लागते .(फार तर सोडा , पेप्सी इ.)आता दुसरा टप्पा , --

या पुढचा टप्पा येतो तो , -

(1) *दारुकामाच्या प्रशिक्षणाचा.* -- त्याला जोडून असतो तो
(2) *परिविक्षाकालाचा* (हा शासकीय व शैक्षणिक शब्द असल्याने कसा कायदेशीर व भारदस्त वाटतो पाहा ),
(3) *स्वतंत्ररित्या दारुकाम करण्याचा .*



## ब) *(1)* दारुपानाचे प्रशिक्षण व परिविक्षाकाल (Training & Probation) निश्चित करणे

दारुपानाचे प्रशिक्षण हा एक महत्वाचा विषय आहे.पण वेगवेगळ्या अडचणींमुळे तो दुर्लक्षित राहिला आहे.त्यात मुख्य अडचण म्हणजे आपली परम्प्रिय भव्यदिव्य संस्कृती.(खरे तर आपल्याच संस्कृतीत मद्याची समांतर संस्कृती आहे.)शिवाय इतरही काही अडचणी आहेत.त्यामुळेच तो शालेय किंवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट करता येत नाही.पाश्चात्य संस्कृती याबाबत पुढारलेली आहे.याचा अर्थ त्यांच्या अभ्यासक्रमात ते आहे असे नव्हे तर त्यांच्या जीवनशैलीतच ते मान्य केले गेले आहे.कारण त्यांना लाभलेले नैसर्गिक पर्यावरण , हवामान व सामाजिक ,घरगुती वातावरण त्या प्रकारचे असते .त्यामुळे त्यांना वेगळ्या स्वतंत्र अभ्यासक्रमाची गरज भासत नसावी.

### (a) दारुकामाचे अभ्यासक्रम व अभ्यासमंडळ

या प्रशिक्षणाचा अगदी पहिला टप्पा म्हणजे त्या काही एक विशिष्ट अभ्यासक्रमही तयार करणे .त्यासाठी त्याचे स्वतंत्र अभ्यासमंडळ (Board of Studies in Alchohol, Liquor and Wine Training and Consumption ) स्थापन करता येईल.साहजिकच सदस्य मोठ्या उत्साहात अभ्यासक्रम तयार करतील.भारतातील विद्यापीठे व शाळा इत्यादी शैक्षणिक संस्थाची अभ्यासमंडळे करतात काय ? तर साधारणतः त्यांच्याबाबत असे म्हणण्याची एक पध्दत अशी आहे की बुवा " आपल्याला जे येते , ज्यावर आपण पुस्तके , गाईडे , त्याची लोणीदार नवनीते , 21 / 42 अपेक्षिते लिहू शकतो व खपवू शकतो , तसेच आपणास माहित नसलेली आणि ( व ते नव्याने वाचण्याची , अभ्यासाची भीती असल्यामुळे )माहित करुन घेण्याची इच्छाच नसलेली प्रकरणे अभ्यासक्रमात न टाकण्याचे दूरदृष्टिकोनयुक्त धोरण अभ्यासमंडळ सदस्य करीत असतात , अशी खरी अफवा आहे." इथे , दारूच्या बाबतीत मात्र तसे घडणार नाही.कारण मंडळ सदस्य तज्ञच असतील.

शिवाय या पारंपरिक,प्रचलित अभ्यासमंडळांचे सदस्य निवडणुका , राजकारण, दबावगट, धाकदपटशा , जात , लिंग इत्यादी निकषांदवारे नेमले जातात. जनरली अभ्यासमंडळावर 'तज्ञांची ' नेमणूक करण्याची पध्दत आहे पण ते आधीच तज्ञ असतात असेही नाही तर नेमले गेल्यानंतर मात्र ते सगळेच 'आपोआप ' तज्ञ होवून बसतात.(भारत हा अतिशय धार्मिक , अध्यात्मिक व योगी लोकांचा देश असल्याने 'नियुक्तिनंतरची' ही तज्ञता हा एक किरकोळ चमत्कार आहे.)मात्र या धार्मिक परंपरेला अजिबात फाटा देवून या नव्या विषयाच्या अभ्यासमंडळांची रचना होईल . तिथे राजकारण इत्यादी वशिलेबाजी असे काही न होता सरळपणे सदस्य मिळू शकतील.कारण यात अशा तज्ञांनाच सदस्यत्व दिले जाईल की ज्यांना नवीन कसलाही अभ्यास , वाचन करावयाची गरज नाही , काहीही वगळण्याची गरज नाही .( एक पेग सुध्दा ! )जे या क्षेत्रातील विविध बाजूचे तज्ञ आहेत तेच या अभ्यासमंडळावर येतील. कसे असेल हे अभ्यासमंडळ ?

### (b) अभ्यासमंडळाचे स्वरुप

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

मुख्य B.O.S.चे दोन उप B.O.S. करता येतील : एक देशी ( किंवा एत्तदेशीय ) मद्य तज्ञांचे व दुसरे विदेशी (किंवा विलायती अर्थात जागतिक )मद्यतज्ञांचे .या नियमानुसार किमान अकराजणांच्या या अभ्यासमंडळात प्रत्यक्ष मद्यपि , मद्यवितरक , मद्यनिर्माते , बारचालक, गुत्तेचालक इत्यादींचा समावेश होवू शकतो .बारचालकांमधये कंपलसरीली ' शेट्टी ' आडनावाचे किमान सहाजण असले पाहिजेत.(म्हणजे ते बहुमताने जिंकू शकतील ! ) शिवाय शासनाचे प्रतिनिधी म्हणून दारुबंदी , उत्पादनशुल्क खात्याचे अधिकारी व कर्मचारी , मद्य परवाना देणारा शिपाईगडी यांचाही समावेश करता येईल.

विशेष निमंत्रक - सल्लागार म्हणून वाईनरीज्चे संचालक , साखर कारखानदार आणि अस्सल दारुत बेमालूम भेसळ करणारे (आदि शंकराचार्यांनी म्हंटलेच आहे की जग म्हणजे सत्य आणि असत्य यांची बेमालूम सरमिसळ आहे )व देशी दारुची वाहतूक करणारे गावोगावचे टायरवाले , सायकलस्वार तसेच शहरांमधील ' हत्ती ,गाय,बैल, घोडा, जिराफ, उंदीर, झुरळ ' इत्यादी प्राण्यांच्या मदतीने दारुवहन करणारे पंटरलोक , गुत्त्यात व बारमध्ये प्रत्यक्ष सर्व्हीस देणारे वेटर्स व ' टॉपलेस वेटऱ्या ' , बारटेंडर यांचाही प्रातिनिधीक समावेश केल्यास अभ्यासमंडळ अतिशय भारदस्त होईल, यात शंकाच नाही ! मुख्य म्हणजे पोलिसांचे विविधप्रकारचे प्रतिनिधीही यात घेता येतील. बंदच्या दिवशी पोलिसव्हनमधूनच दारु आणणारे किमयागार पोलिस , ती त्याच दिवशी हट्टाने पिणारे सर्व स्तरिय अधिकारी, राजकारणी, समाजकारणी, शहरी, ग्राम्य, सभ्य व ग्राम्य अशा थोर पत्रकारांचाही समावेश करता येईल.

## तळीराम अध्यासनाची स्थापना व स्वायत्तता

अभ्यास मंडळ अपुरे पडले अथवा कुणाचा सन्मान करावयाचा असला किंवा ' अपना आदमी ' मानलेल्या कुणाच्या पोटापाण्याची (त्याच्या रोजच्या पेगची सुध्दा)सोय करावयाची असली की विद्यापीठ पातळीवर अध्यासन स्थापन करण्याची पवित्र पध्दती गेल्या दशकात ' पाडण्यात ' आली आहे. तिचा अत्यंत प्रेमाने आदर करुन मद्यविषयक अध्यासनाची स्थापनाही करता येईल.या अध्यासनाला ' **देशोदेशीचे तळीराम अध्यासन** ' असे नाम मी तूर्तास सुचविते.(नको असल्यास नंतर नामांतर चळवळ करण्यास अवकाश आहे, हे नम्रपूर्वक लक्षात घ्यावे , ही विनम्र विनंती विशेष !)

अध्यासनासाठी आधी हितचिंतकाकडून देणगी घेतली जाते.मग ते अध्यासन स्थिरस्थावरमालमत्तामय झाले की मग 'विद्यापीठ अनुदान आयोग ' , केंद्रीय मनुष्यबळ विकास खाते ' इत्यांदींकडून कायम स्वरुपी मंजूर करता येते. या नियमाला अनुसरुन या ' **दे.दे. तळीराम अध्यासनासाठी** साखर कारखानदार,वाईनरीज् ,मद्यसम्राट , मद्यराजे, मद्यसेवक व समस्त मद्यप्रेमीजनांकडून देणग्या मिळविता येतील.त्यात अर्थातच पुन्हा शेट्टी आडनावाचे डझन दोन डझन देणगीदार असावेत, ही किरकोळ अट राहीलच.त्याचप्रमाणे त्यात स्त्री देणगीदार नसेल , ही दुसरी कारकोळ अट असेल.(कारकोळ शब्द बरोबर आहे.तो किरकोळला जोडून येतो.प्रुफ रिडरने बदलू नये.)

अध्यासन प्रमुख (म्हणजे चेअर 'मॅन') कुणाला नेमावे, त्यांच्या दिमतीला किती स्टाफ असेल , ऑफिस कुठे, त्याची रचना काय इत्यादी बाबी तपशीलात **'बसून'** ठरविता येईल.इ.इ. या अध्यासनांना राज्यशासनाच्या व केंद्रशासनाच्या कोणत्याही महामंडळसारखा दर्जा द्यावा .अध्यासनप्रमुख व त्याचा स्टाफ यांची मग चंगळचंगळच होईल.

## पदव्या कशा असतील ?

एकदा अभ्यासक्रम तयार झाले , तज्ञता आली की पदव्या इत्यादींचा प्रश्न येईल .त्यासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम , पदविका , खुद्द पदवी , पदव्युत्तर अभ्यासक्रम,विद्यावाचस्पती इत्यादी तयार करता येतील.त्यानंतर मद्यविद्यापीठाची स्थापना हा गडगंज विषय आहेच .

## मद्यविद्यापीठ

सध्या कोणतेच विद्यापीठ सुरु करण्यास शासन उत्सुक नाही किंवा उत्सुक आहे. एखादी शैक्षणिक संस्था बेफाम वाढवू दिली की तिला ' अभिमत विद्यापीठाचा दर्जा ' मात्र दिला जावू शकतो. अशा विद्यापीठांना शासन नियुक्त कुलपतींप्रमाणेच स्वतःचे कुलपती, कुलगुरु, उपकुलगुरु (हा प्राणी साधारणतः बांधकाम मुकादमासारखा दिसत असतो किंवा जो तसा दिसतो ते उपकुलगुरु समजावा) इत्यादी असतात.[4] या दारु निर्मितीच्या अभ्यासक्रम , महाविद्यालये राबविणाऱ्या व त्यांना पदव्या देवून नियंत्रण आणणाऱ्या विद्यापीठास "अभिमद्य विद्यापीठ" असे नाव तूर्तास देता येईल.(कोण आहे रे तो अनारोग्य विद्यापीठ म्हणणारा ! धरा त्याला.उत्तर : "धरिला मद्यनगरीचा चोर" - धरिला पंढरीचा चोर या भावगीताफेम )



## विविध पुरस्कार

या नंतरचा ज्वलंत प्रश्न म्हणजे पुरस्काराचा प्रश्न तयार होईल.पद्मश्री , पद्मभूषण इत्यादीच्या धर्तीवर मद्यश्री ,मद्यभूषण ते मद्यरत्न , मद्यसुंदर, सुंदरी, तसेच मद्यनोबेल, किंवा मद्यतळीराम इत्यादी .स्थानिक ते जागतिक अथवा ब्रह्माण्डिक लेव्हलचे पुरस्कार ठरविता येतील अर्थातच प्रायोजकांमध्ये एतद्देशीय शुध्द्ध् भारतीय शेट्टी ते जागतिक शेट्टी मंडळी असतीलच .हे पुरस्कार मद्यपिसाठी जसे असतील तसे मद्यवाहतूकदार, मद्यनिर्मिक , मद्यउद्योगातील विविध प्रकारचे कर्मचारी यांच्यासाठीही असावेतच. पण मुंबई,चेन्नई,दिल्ली इत्यादी अतिभयानक महानगरांपासून ते 125 (एकशे पंचवीस फक्त)लोकसंख्या असलेल्या टुकार खेड्यातील मद्यविक्रेत्यांपर्यंत सर्व वितरक व त्यांचे सर्व प्रकारचे वाहतूकदार घटक यांच्यासाठीही असावेत.खेडी महत्वाची आहेतच.भारताचे सगळे जातकारण व राजकारण खेड्यांना ओलिस धरुनच चालते. ही संख्या काही थोडीथोडकी नाही साहेब .. .. चांगली साडेपाचलाख खेडी आहेत बर भारतात.

## (C) अभ्यासक्रमाचे स्वरुप

### 1] पहिले प्रकरण :

### - विषयप्रवेश .-

### भारतीय समाजातील दारुचे अस्तित्व मान्य करणे

कोणत्याही विषयाची सुरुवात ही नेहमी 'परिचय ' किंवा ' विषयप्रवेश ' या घटकाने होते. त्यामुळे पहिले प्रकरण किंवा धडा (Unit) म्हणजे <u>दारुचे समाजातील अस्तित्व मान्य करणे</u>.

बऱ्याच वेळेस असे घडते की जी समस्या टाळायची आहे , ती समाजात आपल्या जीवनात आजूबाजूला अघडपणे अस्तित्वात आहे, हे मान्यच केले जात नाही. तिच्या अस्तित्वालाच नकार दिला जातो.(वेदान्तानुसार तर सालं हे जग अस्तित्वातच नाही !त्यामुळे वेदान्ताऐवजी न्यायसांख्य इत्यादी दर्शनांनाच जगाचा भौतिक दृष्टिकोनातून विचार करावा लागला.पण वेदान्त इतका नंबरी की त्याने त्या दर्शनांसह जग मिथ्या ठरविले !आता बों(ब)ला !! )मात्र त्या समस्येने आपला इंगा दाखवला की नाईलाजाने ती मान्य केली जाते.भ्रष्टाचार , बेशिस्त , पूर ,दुष्काळ , इ.इ.वरचा ठोस उपाय केलाच जात नाही .दारुचे व वेश्याव्यवसायाचे हेच दुदैव आहे .त्यांचे अस्तित्वच मान्य केले जात नाही.त्यामुळे तिच्यावर उपाय केला जावू शकत नाही.आपल्या पवित्र संस्कृतीच्या गेल्या दहा हजार वर्षांत दारुपान , त्याची व्यसनाधीनता व स्त्रियांचा बाजार जेवढा झाला नसेल तेवढा या विसाव्या शतकात कमाल पातळीवर पोहचतो

[4] कुलवधू हा याच जातकुळीतील शब्द आहे काय ? - एक पृच्छा . असल्यास नसल्या तज्ञ प्रकाशझोत टाकतील काय ? नाहीतरी ते 'टाकत' असतातच. जरा इकडेही टाका.

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



आहे. त्यावरील उपाय तर शोधलाच पाहिजे.पण सर्व शासनानेच केले पाहिजेत, या खुळचट समजुतीतूनही बाहेत पडून प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार उपाययोजना केली पाहिजे. तेंव्हा समस्येचे समाजातील असणे मान्य करणे , हे पहिले प्रकरण होण्यास हरकत नाही. या प्रकरणात सुरा , दारु,मद्य liquor, wine या व यासम संज्ञाची भीती, कुतुहल , आकर्षण , ती उपलब्ध होण्याची ठिकाणे ( वाईन शॉप्स , गुत्ते, बार,अड्डे इ.) इत्यांदीचा समावेश विषयप्रवेशात करता येईल

## 2] दुसरे प्रकरण
## दारुची ऐतिहासिकता व मानवी जीवनातील महत्व

कोणतीही गोष्ट जनामनावर बिंबवावयाची असेल तर तिचा ऐतिहासिकता समजावून दिली की सोपे जाते. त्यामुळे ' दारुचा इतिहास ' हे या अभ्यासक्रमातील दुसरे प्रकरण असलेच पाहिजे.Myबोली 'इये मराठीचिये नगरी' हा इतिहास शिकवावयाचा असल्याने अभ्यासक्रम कर्त्यांनी 'मराठी विश्वकोश क्र.12 मधील 'मद्य' हा लेखापासून सुरुवात करावी. मद्याच्या व्याख्येपासून त्याची सुरुवात आहे.त्याच लेखात पवित्र वेदांमध्ये, महाकाव्यांमध्ये व मनुस्मृति, महाकवि कालिदासाच्या शांकुतल, कुमारसंभव,रघुवंश या ग्रंथातील मद्याचे उल्लेख ही आहेत.

महाराष्ट्र शासनाने फार पूर्वीपासून ' ब्रिटीश एनसायक्लोपिडीया ' सारखा ज्ञानकोश मराठीत असावा ( किंवा का असू नये ), या उदात्त हेतूने ' मराठी विश्वकोश मंडळा ' ची स्थापना केली .या मंडळाने बरेच कोश प्रसिध्द केले असून सवलतीच्या दरात ते ज्ञानपिपासूंसाठी उपलब्ध करुन दिले आहेत.( या कोशाचे काम अद्यापि पूर्ण झालेले नाही.कारण ज्ञान ही सतत वाढत जाणारी गोष्ट असल्याने ते कामही सतत होत राहिले आहे. ते तसेच होत राहण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे की काय, अशी शंका काही छिद्रान्वेषी घेतात.कारण ब्रिटीश एनसायक्लोपिडीयाने अनेक आवृत्या व त्यांचे पुरवणी खंडही प्रसिध्द केले आहेत.मराठी विश्वकोशाबाबत असे का घडत नाही , अशी दीर्घशंका घेणारे काहीजण आहेत.पण या शंकासुरांकडे दुर्लक्ष केलेले बरे . नतद्रष्ट कुठचे ! तर ते असो.) या नोंदीत मद्याचा इतिहास , निर्मिती प्रक्रिया , मद्यउद्योग , वितरण इत्यादीची सविस्त चर्चा केलेली आहे.

ही नोंद पान क्र.1033 ते 45 अशी बक्कळ 13 पानांची आहे. सर्वश्री. वा.वि. लवाटे, गो. रा. केळकर व व. रा. जोगळेकर या मद्यविषयक अभ्यासकांनी लिहीलेली आहे. झालचं तर पुढे ' मद्यासक्ति ' या नावाचीही नोंद असून ती त्याच खंडात 1045 ते 1047 अशी गच्चमगच्च तीन पाने भरुन आहे. ती श्री. र. वै. शिरवैकर यांनी लिहीली आहे.या दोन्ही लेखांमध्ये मद्याच्या व्याख्येपासून ते मद्यासक्तिपर्यंत व त्यावरील उपाययोजनांपर्यंत या नोंदी आहेत. मद्य या संज्ञेबरोबरच अल्कोहोल,ऊर्ध्वपातन,नशाबंदी याही नोंदी आहेत

शिवाय या सर्व लेखकांनी त्यांच्या लेखांसाठी कोणकोणत्या ग्रंथाची मदत घेतली आहे, याची यादीही दिली आहे. ती सर्व अर्थातच ' आंग्लभाषेतील ' आहेत . मद्य व मद्यासक्ति या दोन लेखातच एकूण 25 संदर्भग्रंथाची सूची आहे.दुदैवाने या सूचीत मराठी ग्रथांचा नामोनिशाण नाही , ही खंत करण्यासारखी बाब आहे.[ ही बाब राज्य शासनाने, तसेच अनेक शासकीय व बिगरशासकीय पुरस्कृत पुरस्कारांनी सम्मा SSSS नित झालेल्या सर्व सुप्रसिध्द लेखकांनी लक्षात घ्यावी ( केवल ' कायम घेत राहावी ' असे नव्हे .)] मराठीत अशा साहित्यनिर्मितीसाठी लेखकांमधील ज्येष्ठ ' पितामहांनी ' लेखन करावेच. त्यासाठी त्यांच्यानंतर ( म्हणजे त्यांच्या महानिर्वाणानंतर ) ज्येष्ठ बनण्याची क्षमता (potential and not capacity)असणाऱ्या परंतु आताच्या विद्यमान काळात कनिष्ठ व होतकरु ( व अर्थातच घोटकरु ) लेखकांना मदतीला घ्यावे.त्यासाठी येणाऱ्या '' खर्चाची जबाबदारी '' अर्थातच या कनिष्ठांवर राहील, हे उघड गो SSS ड गुपित राहिल !!

## वेदवाङ्मयातील नोंदी

प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे
**"दारु कशी पितात रे भाऊ ?" अर्थात मद्यपानाची आचारसंहिता**
श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

विश्वकोशाखेरिज ज्यांना "आमच्या वेदात सग SSSSSSSSSS ळे काही आहे" चे तुणतुणे सतत वाजवावयाचे असते त्यांच्यासाठी व त्यांना तुणतुणे वाजविण्याचे नैतिक धैर्य यावे म्हणून की काय कोण जाणे प्राचीन ऋषीमुनींनी वेदात सर्वत्र मद्याची स्तुति (व निंदा देखील )केलेली आहे.विसाव्या शतकात हे उपयोगी पडावे म्हणून सहासात हजार वर्षांपूर्वीच या सगळ्याचा विचार करुन ती परंपरा जपणारे हे ऋषीमुनी किती दूरदृष्टीचे होते पाहा.यालाच , Intuition , Clairvoyence , Eidetic Intuition म्हणतात ! दुसरे काय ? अशा तुणतुणेकरांसाठी 'वैदिक पदानुक्रम कोशातील ' मद्याच्या शेकडो नोंदींचा उपयोग करता येईल.त्या नोंदी मद्य,सुरा,मैरेय,मदिरा इ. नावांनी आहेत. (हा कोश फारच प्रसिध्द आहे.म्हणजेच तो केवळ अभ्यासकांमध्येच प्रसिध्द आहे ! )



## भारतीय संस्कृतिकोशातील नोंदी

वेदवाङमयावर आधारलेला विश्वकोशासारखाच अन्य एक कोश म्हणजे पं. महादेवशास्त्री जोशी यांनी संपन्न केलेला 'भारतीय संस्कृतिकोश ' होय . या कोशातही दारु, सुरा,मदिरा या नावाने नोंदी आढळतील. शिवाय याच कोशातील ' तंत्रशास्त्र ' या नोंदीतही सुरादेवीचे महात्म्य वर्णन केले आहे. या सुरादेवीचे वर्णन अतिशय सुंदर आहे. तंत्रातील पंचमकारात मद्य हा पहिला मकार आहे.(उरलेले मकार ? ते नंतर बघू .) हा लेख 'तीर्थजिज्ञासूंनी ' व अभ्यासक्रमकर्त्यांनी मुळातूनच वाचावा.

## ब्रिटीश एनसायक्लोपिडीयातील एन्ट्र्या

या शिवाय ब्रिटीश एनसायक्लोपिडीयातील एन्ट्र्याही उपयोगी पडतील. ज्या अभ्यासकांना ब्रिटीश व अमेरिकन अभ्यासकांच्या अभ्यासाचा आधार घेतल्याशिवाय ' आपला अभ्यास पूर्ण झाल्याचे समाधान मिळत नाही , चैन पडत नाही, छानशी झोपही येत नाही आणि मुख्य म्हणजे ' आपल्याच संशोधनाविषयी पक्की खात्री होत नाही ' त्यांच्यासाठी या नोंदी फारच कामाला येतील. Liqueur , wine . alcohol , alcohol abuse, alcohole consumption , alcoholism इत्यादी नावाने या एन्ट्र्या आहेत. ( हुश्श ! सुटलो बुवा ! आता लिहीणे सोप्पे !! - अभ्यासक्रमासाठी पुस्तके व गाईडे पाडणाऱ्यांची एक भावना .)

## 3] तिसरे प्रकरण :
## दारुचे प्रकार किंवा वर्गीकरण

[अ] एतद्देशीय -- गावठी = पहिल्या धारेची , मोसंबी नारंगी , ताडी (शिंदी ), माडी तसेच हातभट्टीची इ. इ.यात एक घष्टी नावाचा प्रकार आहे. घष्टपुष्ट. म्हणता यईल
.[ब] विलायती -- व्हिस्की रम , जिन , वाईन, बियर, कॉकटेल, मॉकटेल .
[क] यातील प्रत्येकाचे उपप्रकार : उदाहरणार्थ व्हिस्की (डीलक्स , प्रीमीयर , रेग्यलर इ.), बियर (लागर, पिल्सनर,डार्टमुंट,म्युनिक,साल्व्हेटर,वुर्टसबर्गर , यीस्ट, पोर्टर,स्टाऊट , लॅंबिंग इत्यादी )
[ड] विलायती दारवातील माईल्ड व स्ट्रॉंग असे दुसरे उपप्रकार .
[इ] पुरुषांच्या दारवा आणि स्त्रियांच्या दारवा (जीन,व्होडका , मॉकटेल्स,वाईन इ.)

विश्वकोशातील नोंदीतील सरळ मद्ये व ऊर्ध्वपातित मद्ये (Spirited )हे वर्गीकरणसुध्दा लक्षात घेता येईल. झालंच तर शासनाने ' वाईन ' चे राष्ट्रीय व महाराष्ट्रीय उत्पादन सुरु करण्याचा निर्णय व त्याची अमलबजावणीही सुरु केल्याने वाईनची नोंद देशी या कॅटेगरीत घेता येईल, ही एक विशेष आनंदाची बाब म्हणता येईल.

## 4] चौथे प्रकरण :
## दारुचा दर्जा, पिण्याचे प्रमाण व प्रकार

अ )पेगचे प्रकार : स्मॉल, लार्ज ,नीप, हाफ, फुल्ल (खंबा )
ब )बीयरमध्ये : बॉटल्ड, टीनड् ,पीचर
क ) दारुच्या दर्जाची व प्रकाराची , दर्जानुसार ती किती प्यावी या घटकांचा समावेश करता येईल. उदाहरणार्थ व्हीस्की असेल तर ती किती घ्यावी ,पहिला पेग पंढरपूर / पुणे पेग असावा की पतियाला पेग असावा , रम असेल तर किती प्यावी , गावठी असेल ती किती पचेल त्याचा अंदाज घेवूनच ती सुरु करावी , इ.इ.बियरला पेग सिस्टिम नसते (प्लीज नोट ) तर ती थेट बाटली व पिचरमध्ये मिळते ,अशी माहिती यात असेल .
ड) असली दारु व नकली यातील फरक आणि तो फरक करण्याचे निकष
ई) दारुची वैशिष्ट्ये , गुणधर्म व परिणाम



## 5] पाचवे प्रकरण :
## दारु व ऋतूमान

**अ** )कोणत्या ऋतूत कोणती दारु पिणे चांगले , हे स्वतंत्र प्रकरण करणे फार आवश्यक आहे.कारण 'भार्तातले' दारुप्रेमी ' माला आवडते '' म्हणून कोणतीही दारु कोणत्याही ऋतूत पितात ( लेकाचे ! )उदाहरणार्थ भारतात तीन ऋतू आहेत हे लक्षात धरुन उन्हाळ्यात बियर चांगली असते, हिवाळ्यात रम बरी वाटू शकते , पावसाळ्यात रम व व्हिस्की दोन्ही बरे पडतात तसेच जीन व व्होडका सुध्दा चालेल , कडक हिवाळ्यात (ओठफुट्या ) ब्रॅण्डी व्यक्तिगत (कायम )व कौटुंबिक पातळीवरही (कधीकधी )उत्तम असते, असा फरक करता येईल.
**ब** ) परदेशातील हवामान व भारतातील हवामान यांची तुलना.आणि त्यानुसार होणारा दारुपानातील फरक करणे आवश्यक आहे .भारत उष्णकटिबंधाचा (भारतात कट्या व कट्यारीवाल्या फार ! सिंहकट्यावाल्या कमी व गजकट्यावाल्या अति ! )देश असल्याने पिणाऱ्याच्या अंगाला व त्याचा इतरांना दारुचा उग्र वास येतो. पाश्चात्य राष्ट्रे जनरली थंड हवेची असल्याने तो वास येत नाही. त्यामुळे तिथे शरीराचे उष्णतामान टिकविण्यासाठी दारुची (ती मुख्यत ब्रॅण्डी व वाईन असते ) गरज असते. ती पुरुषांसह सर्वानांच असते.त्यामुळे तेथे स्त्रियाही दारु पितात .

## 6] सहावे प्रकरण :
## दारु पिणाऱ्याची मानसिक रचना

या विषयावर स्वतंत्र पेपरच करता येतील.याचे साधारण उघडपणे तीन भाग करता येतील
*(1 ) तरलता व स्वाभिमान ( 2 )लाचारी वा लाळघोटेपणा ( 3 )दारु व हिंसेचे मानसशास्त्र .*

### *(1 ) तरलता व स्वाभिमान*

पिणे सुरु झाल्यानंतर आधीची तरलता, नंतर प्रत्येक पेगबरोबर बदलणारी मानसिकता , उदारमनस्कता , शेवटच्या पैशापर्यंत पिण्याची प्रवृत्ती इत्यादी घटकांचा या युनिटमध्ये समावेश होईल.शिवाय ' स्वकमाईची पिण्यात कसा स्वाभिमान असतो ' (निदान मराठी माणसाचा तरी ! ), बापाच्या किंवा बापजाद्यांच्या (बापाच्या कायदेशीर व बेकायदेशीर ज्यादा कमाई असणाऱ्या )
कमाईतून पिण्यामुळे पिण्याच्या प्रक्रियेवर व आनंदावर होणारे मानसिक तोटे कोणते , मित्र पाजत असल्यास त्याच्या नाईलाजाने ऐकाव्या लागणाऱ्या बडबडीचा होणारा परिणाम व त्यामुळे येणारी आगतिकता ; स्वाभिमानाचे अपहरण इत्यादींचा यात समावेश होईल.

### *( 2 ) लाचारी वा लाळघोटेपणा*

इतरांनी कारण नसताना पाजल्यानंतर (" चल रे बसू जरा '' ) आधी तोंडात येणारी लाळ व कालांतराने नंतर स्वभावात येणारा कायमस्वरुपाचा लाळघोटेपणा या व इतर अनेक प्रकारच्या मानसिकतेचा विचार येथे करता

येईल.विशेषतः राजकीय नेत्यांचे पीए., सरकारी , खासगी पीआरओ , गावपातळीवरचे पत्रकार यांची अतिरिक्त दारुकामामुळे निर्माण होणारी लाळघोटी मानसिकता व तिचा त्यांच्या आगरकरी - टिळकी पत्रकारीतेवर होणारा अप्रत्यक्ष परिणाम तपासता येईलच.शिवाय या पत्रकारांना वृत्तपत्रमालकांमकडून मिळणारे तुटपुंजे (अप )मानधन ; त्यापायी त्यांची होणारी कुचंबणा या सर्वांचा परिणाम म्हणून कायमच दारुकामासाठी रोज ' नवा बकरा ' पकडण्यासाठी करावी लागणारी यातायात यांची मांडणी करता येईल. आणि त्यातूनच या पत्रकारांची ' पत्रकारीतेकडून जाहिरातदारीकडे ' ( 'संभोगातून समाधिकडे ' फेम )होणारी वाटचाल अशा अनंत विषयांचा समावेश या सबयुनिटमध्ये करता येईल.(एखादे यनिट कमीच पडले तर जाहीरातदार झालेले पत्रकार दोन दोन दरपत्रके कशी छापतात , त्यातून कशी स्वसमृध्दि साधतात,त्या समृध्दिवर वाकडी नजर पडू नये म्हणून आवृत्तीचे संपादक,वृत्तसंपादक किंवा मुख्य उपसंपादक यांची कशी ' अर्थपूर्ण ' सरबराई किंवा रसबराई करतात , याचा तपशील (पेगमध्ये )पाणी घालून टाकता येईलच.)

### *(3) दारु व हिंसेचे मानसशास्त्र*

दारुकामानंतर माणूस सहजपणे हिंसेकडे वळू शकतो. म्हणून कोणतीही हिंसा होण्यापुर्वी किंवा नंतर वधक / हिंसक दारुकामाकडेच वळतो, असे हिंसेचे मानसशास्त्र सांगते. दारुमुळे येणारी उत्तेजित अवस्था व त्यामुळे अचानक अंगात येणारी रानरेडी ताकद हिंसेला पूरक ठरते . त्यामुळेच सैनिकांना कायम दारु स्वस्तात उपलब्ध करुन देण्यात येते .अर्थात सार्वजनिकरित्या मिळणारी दारु व मिल्ट्री कँटिनमध्ये मिळणारी दारु यात फरक तसा नसतोच. असतो तो फक्त किमतीत व शुध्दतेत. मिल्ट्रीची दारु इतकी शुध्द व दर्जेदार असते म्हणे की पिणारा ( स्टुपिड सिव्हलियन्स !! ) काही काळातच बेशुध्द होवू शकतो. संरक्षण खात्याच्या सर्व दलांमध्ये दारु अतिशय कॉमन असून ती दैंनदिन बाब आहे.का आहे ?कारण " आपण हिंसा करतो आहोत ", याचा अपराधगंड मद्यपानामुळे कमी होतो.त्यामुळेच गँगमधली शार्पशूटर मंडळी कुणालातरी ' टपकवायला ' जाताना, सरकारच्या आदेशानुसार ' एनकाऊंटर थर्ड ' करणारी आडदांड पोलिसदादामंडळी ' कार्यक्रम ' करण्यापूर्वी दारुप्राशन करुन जातात. हाच तो क्रुशल मुद्दा असून दारुचा व हिंसेच्या मानसशास्त्राचा इथे संबंध येतो. थोर अशा ' महाभारत ' या महाकाव्यात भगवान श्रीकृष्णाच्या ' हजारो कुळी ' (96 कुळीच्या धर्तीवर हो ! ) घराण्यातील यादवांची परस्परातील आत्मनाशक युध्दे होण्यापूर्वी सर्व यादवांनी बेधूंद मद्यपान केल्याचे महर्षी व्यास अतीव दुःखाने नमूद करतात .तीच ती कुप्रसिध्द ' यादवी ' . वेदांमधील उल्लेखांनुसार देवदानव युध्दाला जाताना यथेच्छ सुरापान करीत .अर्थातच दारु व हिंसा यांच्या अधिक सखोल माहितीसाठी सल्लागार म्हणून यात ' मुरलेल्या ' मानसशास्त्रज्ञांचा समावेश करता येईल.

## 7] सातवे प्रकरण :

## दारु विक्रेत्यांचा दारुपानाविषयी असलेला निष्काम कर्मयोग व अनासक्तीयोग (अर्थात दारुविक्रेते स्वतः दारु का पित नाहीत याचे रहस्य )

हा इतका मोठा विषय आहे की त्याचे स्वतंत्र पुस्तकच केले पाहिजे ! दारु विक्रेते स्वतः व त्यांची मुलेबाळे कधीही उघड किंवा चोरुनही दारु पित नाहीत.एवढेच नव्हे तर त्यांचे या व्यवसायात काम करणारे वा भागीदार असणारे तमाम सख्खे बंधूजन ,काका, मामा , मामेभाऊ , चुलतभाऊ , आते भाऊ , एवढेच काय पण कामाला आलेले गावभाऊदेखील कधीही दारु पित नाहीत , हा नेहमीचा अनुभव आहे.

एवढी दारुच्या सागरात (नवसागराच्या भवसागरात ) असूनही ही मंडळी दारु का पित नाहीत, हे एक रहस्य आहे. ही मंडळी म्हणजे पार एकनाथाची, तुकारामाची, रामदासाची (छे छे रामदासाची नाही ! चुकून आलं तोंडात !! )पोरे असल्यासारखी संतसज्जनच कशी असतात , ही कुटूंबे दुकानात , घरात जास्तच धार्मिक का असतात , ती नेहमीच विविध सणमोहरम इत्यादींना उदारहस्ते वर्गण्या का देतात, गांधीजयंतीसारख्या दिवशी खुद्द मालकच

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



किंवा मालकवजा माणूस ग्राहकांना अतिनम्र व गुपचुपपणे सेवा देण्यास का उत्साहित असतो , त्यामागच्या त्याच्या प्रेरणा इत्यादींचाही समावेश करता येईल. हा दारुविषयक ' अनासक्तीयोग व निष्कामकर्मयोग ' ही मंडळी कोठून प्राप्त करतात , हे एक गूढच आहे. त्यांना कुणी या योगसाधनेतील पतंजली ( की पिताजंली ) भेटतो हे शोधले पाहिजे. आता हे निष्काम कर्मयोग व अनासक्तीयोग दोन्ही योग एकच आहेत, वेगळे नाहीत, असा येडपट आक्षेप शहाणीसुरती माणसे येथे घेणार नाहीत, हे मला व तुमच्यातील शहाण्यांना माहितच आहे.)

## एक अतिकिफायतशीर व्यापक प्रोजेक्ट

अशा अनेक प्रकरणांचा समावेश अभ्यासक्रमात करता येईल.त्यासाठी नेहमीचे तज्ञ मदत करतीलच.या अभ्यासक्रमासाठी मटिरियलही तयार करावे लागेल. काही उपलब्ध आहे काही तयार करावे लागेल.प्रकरण दुसऱ्यात नमूद केल्याप्रमाणे अनेक प्रकारचे वैदिक व अवैदिक मद्यसंदर्भ ऑलरेडीच उपलब्ध आहे. त्याला जोडूनच नव्या जीवनसंदर्भात नव्या पध्दतींनी काही लेख, पुस्तके लिहावी लागतील. सुप्रसिध्द तत्वचिंतक मे.पु.रेगे व प्रसिध्द साहित्यिक अरुण शेवते यांनी असे लेखन व संपादन केले आहे .क्रॉसवर्ड, ब्रिटीश लायब्ररी सारख्या ठिकाणी काही सदंर्भ पुस्तके मिळू शकतील. मराठी पुस्तक दुकानदारांकडे ही कदाचित मिळू शकेल !!!! ते अर्थातच एखाद्या मराठी प्रकाशकाने प्रसिध्द केले असले पाहिजे.

प्रशिक्षणाचा हा कार्यक्रम काही तत्वचिंतनासारखा केवळ वैचारिक नाही. तर त्याला प्रात्यक्षिकांची गरज आहेच. त्यासाठी प्रयोगशाळाही लागतील. हा एक फार मोठा Project च होईल. त्यामुळे यात एतद्देशीय , परदेशस्थ भारतीय व ओरिजिनल परदेशी भांडवलदार यात गुंतवणूक करु शकतील. त्यामुळे रोजगाराचीही नवी मोठी, व्यापक संधी उपलब्ध होईल. मुख्य म्हणजे अतिशय मोठी चिरंतन अनादी अनंत बाजारपेठ उपलब्ध होईल, याकडे मी (नम्रपणे )आपणा सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो.हा फायदा किती होवू शकतो, हे याच लेखातील *' दारुकामाचे अर्थशास्त्र '* हा भाग वाचल्यानंतरच चाणाक्ष गुंतवणूकदारांच्या लक्षात येईलच . हा Project लवकरच साकारेल, यात शंका नाही.पण तूर्तास प्रशिक्षणाची सुरुवात कशी करावी , याची घोर चिंता टळावी म्हणून काही एक पूर्ण एतद्देशीय , घरगुती स्वरुपाचा आराखडा मी पुढीलप्रमाणे देत आहे.

## 8] आठवे प्रकरण :

## दारू : एक प्रभावी माध्यम

आजकाल कोणताही विषय 'माध्यम' या विषयाशी जोडल्याखेरिज लोकांचे समाधान होत नाही. शिवाय एखादा माणूस एड्सग्रस्त असतो तसा आजा सारा समाज माध्यमग्रस्त झाला आहे. पारंपरिक वृत्तपत्रे, दूरचित्राणी, दूरदर्शन इत्यादी बरोबर महाजाल हे ही माध्यम आले आहे. त्यामुळे सोशल मिडिया नावाचे नवेच वैचारिक लफडे जोरात चालू झाले आहे. या माध्यमाच्या आधीच समाजात दारू हा सोशल मिडियम म्हणून काम करीत आहे, याची नोंद घेतली पाहिजे.

दारु - एक माध्यम 'संवादाचे' असा खरा नवा ताजा आणि दणकेदार लेख मी लिहिनच. पण आता फक्त मुद्दा लक्षात आणून देतो. दारू हा संवादाचा प्राचीन मार्ग आणि माध्यम आहे. कुठल्याही फालतू अर्जावर किंवा फ्रेंडशिप अथवा लग्नाच्या फॉर्मवर दारूच्या पिण्याचे पर्याय असतात. त्यात एक पर्याय सोशल ड्रिंक हा ही असतो. कारण दारु हा सोशल सोशल मिडियम मानला जातो. जसे Sex हे माध्यम आहे. चांगला कामसंबंध हा चांगला संवाद असतो. Sex मुळे संवाद स्पष्ट होतो, नग्नसत्य समोर येते. कामसंबंधात अर्थाचा श्लेष रहात नाही. जे काही आहे ते थेट आणि ताठरपणे समोर येते. तमाम स्त्री-पुरुषांना ही थेट, ताठ भूमिकाच आवडते. अगदी तसेच तसे दारुचे घडते. दारूमुळे अनेक रुसवेफुगवे दूर होतात. संवाद सरु होतो. म्हणून दारूला माध्यमाचा दर्जा दिला पाहिजे.

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

शिवाय दारूचे गुत्ते, कारखाने, वायनऱ्या या साऱ्या राजकीय कार्यकर्ते, त्यांचे नेते यांच्याच मालकीच्या असतात. थोर राजाश्रयामुळे लोकशाहीचा पाचवा खांब म्हणून दारु या माध्यमाला दर्जा लाभला पाहिजे, असा माजा प्रस्ताव आहे.

## 9] नववे प्रकरण :
## दारू - सत्याचा अस्सल मार्ग



जे. कृष्णमूर्ती म्हणून एक विचारवंत होवून गेले. त्यांनी "सत्याकडे जाण्याचा मार्ग उपलब्ध नसतो, तो प्रत्येकाने स्वतःचा स्वतः तयार करावयाचा असतो," असा सिद्धान्त मांडला. त्यास 'सत्यः एक पथहीन प्रदेश ' असे म्हणता येईल.

'सत्य म्हणजे काय ? ' हा तत्त्वज्ञानातील एक अतिशय महत्वाचा मूलभूत प्रश्न असून त्यातून सत्ताशास्त्र किंवा सद्वस्तूमीमांसा विकसित होते.ब्रह्म, ईश्वर किंवा सद्वस्तू हीच अंतिम सत्य असून बाह्य जग हा मिथ्या किंवा भास आहे, ईश्वरभक्ति, प्रार्थना, साधूजीवन हे सत्याचे मार्ग आहेत, असेही आजवर समजले गेले. कृष्णमूर्तीसुध्दा सत्य संकल्पनेचा विचार करतात. तथापि त्यांची सत्याची व्याख्या, संकल्पना अतीत नाही, ती इहवादी म्हणावी लागेल. पारंपररिक सत्ताशास्त्र ते नाकारतात.

कृष्णमूर्तींची सत्यविषयक संकल्पना The Kingdom Of Happiness, Who brings the Truth, By what Authority Life in Freedom या व्याख्यांनांमधून व्यक्त होते. त्याचप्रमाणे 'तारका संघ' च्या विसर्जनप्रसंगी ओमान (हॉलंड) येथे 03 ऑगस्ट 1929 रोजी दिलेल्या व्याख्यानामधून ती संकल्पना जास्त स्पष्ट झाली आहे. या व्याख्यानात ते म्हणतात,

"मी स्पष्टपणे सांगतो की, सत्य हा एक रस्ता नसलेला प्रदेश आहे. अमुक एका रस्त्याने अमुक एका धर्माद्वारे किंवा अमुक एका पंथाद्वारे तुम्हाला सत्याप्रत पोचता येणार नाही. .. .. .. सत्य हे अमर्याद, असंस्कारबद्धता असल्याने आणि कुठल्याही मार्गाने प्राप्त करुन घेता येणार नसल्याने त्याला संघटित स्वरुप येत नाही. लोकांना एका विशिष्ट मार्गाने नेण्यासाठी किंवा त्यांना जबरदस्तीने त्यात ओढण्यासाठी एखादी संघटनाही स्थापन करु नये. हे जर तुम्हाला समजत असेल तर एखादया श्रद्धेभोवती संघटना उभी करणे कसे अशक्य आहे, हे तुम्हांला दिसून येईल. श्रद्धा ही केवळ व्यक्तिगत बाब आहे. आणि तिला संघटित स्वरुप देता येणे शक्य नाही... .. तुम्ही जर तसे केले तर ती श्रद्धा मृत होते, स्फटिकासारखी कठीण रुप धारण करते. इतरांवर लादण्यासाठी तिचा एखादा संप्रदाय, एखादा पंथ किंवा एखादा धर्म बनून जातो.

जगभर सगळीकडे प्रत्येकजण हेच करण्याच्या प्रयत्नात असतो. जे दुबळे आहेत, जे क्षणिक असमाधानी झालेले आहेत त्यांच्यासाठी सत्याचा संकोच करून त्याचे खेळणे बनविले जाते.सत्याचे अवतरण करता येत नाही. उलट व्यक्तीनेच त्याच्याप्रत जाण्यासाठी आरोहणाचा प्रयत्न केला पाहिजे. तुम्ही पर्वतशिखर पर्वताच्या पायथ्याशी आणू शकत नाही. तुम्हाला गिरीशिखर गाठायचे असेल तर दरीतून जायला हवे, धोक्याच्या कड्यांना न भिता चढणीच्या जागा पार करायला हव्यात. [सत्याप्रत तुम्ही आरोहण करायला पाहिजे.ते खाली आणता येणार नाही.] तत्वप्रणांली किंवा कल्पनांबददलची आवड संघटनाप्रमाणे कायम राखली जाते पण या संघटना केवळ बाहेरुनच आवड निर्माण करु शकतात. निखल सत्यावरील प्रीतीमधून जी आवड उपजलेली नसते, पण ती संघटनेद्वारे निर्माण केली जाते, तिला मुळीच महत्व नसते. संघटना म्हणजे ज्यात तिचे सभासद सोयिस्करपणे बसू शकतात अशी चौकट बनते. तिचे सभासद मग सत्याप्रत जाण्याचा किंवा गिरिशिखर गाठण्याचा प्रयत्न करत नाहीत, तर उलट स्वतःसाठी एक सोयिस्कर जागा तयार करून तिथे आश्रय घेतात किंवा संघटनेकडून त्या ठिकाणी स्वतःला ठेवून घेतात आणि असे गृहीत धरुन चालतात की त्यामुळे संघटना त्यांना सत्याप्रत घेऊन जाईल."

आता, लक्षात येईल की कृष्णमूर्ती एकतर वेडे आहेत, त्यांना पॅरानोईया झाला आहे किंवा ते खोटे बोलत आहेत. कारण सत्याकडे जाण्याचा मार्ग दारूतून जातो. हा आपला रोजचाा अनुभव आहे. दारु प्यायल्यावर लोक खरं बोलतातं. आणि सांगताततही. " दारु प्यायलोय खोटं नाही बोलणार ! " लोक मात्र बावळटांसारखे अन्न,अग्नी - विडीसिगारेट किंवा लक्ष्मी - पैसे हातात घेवूनही लोक खरं किंवा बहुधा खोटं बोलतात.बायका मात्र नवऱ्याला व

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

नवरा बायकोला 'मुलांच्या ' डोक्यावर हात ठेवून खरं बोलायला भाग पाडतात. हा सगळा च्युतियानंदी प्रकार आहे. कोर्टात तर लोक गीता, कुराण, बायबलवर हात ठेवून खोटं बोलत असतात.

पण दारू पिणारा कधीही खोट बोलत नाही, तो नेहमी सत्य बोलतो. म्हणून दारू हा तत्त्वज्ञानाच्या, अध्यात्मशास्त्राच्या आणि धर्मविषयक अभ्यासक्रमात 'सत्याकडे नेणारा मार्ग' हा टॉपिक म्हणून समाविष्ट झाला पाहिजे. निदान सत्य सापडले नाही तरी नग्न सत्याच्या जवळ जाता येते , त्या दिशेने प्रवास सुरु करता येतो.

## प्रशिक्षण केंद्रांची उभारणी व रचना (आपले कुटुंब )



मद्यपान प्रशिक्षणाची गरज आहे , हे एकदा तत्वतः तरी मान्य झाले की हे प्रशिक्षण कुणि द्यावे ? कुठे व कसे द्यावे ? असे प्रश्न निर्माण होतील. एकदा अभ्यासक्रम तयार झाला की तो विद्यापीठात , संस्थांमध्ये किंवा माध्यमिक व उच्चमाध्यमिक बोर्डात लावून टाकण्याचा मोह होईल. तो कटाक्षाने टाळावा.दारु प्रशिक्षणासाठी निदान सुरुवातीच्या श्रीगणेशारंभीच्या काळात तरी ' *अनौपचारीक प्रशिक्षण संस्थां* ' चीच नितांत गरज आहे, हे लक्षात घ्यावे. सध्या शिक्षणाचे खासगीकरणाचे जोरदार सुनामी वारे वाहात असल्याने हे नशीले शिक्षण तरी सरकारी साचेबंद धबडग्यात देता येणारच नाही.त्यासाठी खासगी तत्त्वावरच ते देता येईल.हे प्रकरण जरा मोठे आहे. विस्ताराने लिहावे लागेल.(सावध संपादका सावध रे / धोका आणखी एका लेखाचा रे !! )तूर्तास स्मॉल स्केलवर छोट्या लेखापासून विचार सुरु करता येईल.शिवाय सरकारीकरणात प्रशिक्षक मिळविण्याची अडचण होते.

Charity begins at home या नैतिक उक्तिनुसार कोणत्याही चांगल्यावाईटाचा शुभारंभ घरापासूनच व्हावा.घर ही कोणत्याही बालकाची पहिली शाळा असते,असे आधुनिक शिक्षणतज्ञांचे मत आहेच. भारतीय संस्कृतीत तर घराला, कुटुंबाला केव्ह ऽ ऽ ऽ ढे महत्व आहे ! घरच्या वडीलधारे व ज्येष्ठांचे मार्गदर्शन नसल्याने होतकरु ( म्हणजेच घोटकरु ! ) जवानजवानीनां ते मार्गदर्शन कुठून तरी बाहेरुनच मिळवावे लागते. त्यामुळे त्या बिचाऱ्यांना दारुपानाची पध्दतीशास्त्रच परिचित होत नाही.परिणामी व्यसनाधीनता वाढीस लागू शकते.व उत्तरायुष्यात या अध्यात्मिक आनंदाला माणूस मुकू लागतो .

शिवाय या पवित्र व उच्च संस्कृतीनुसार घरपुरुष = पिताश्री हेच आपल्या ( म्हणजे त्यांच्या ) पुत्राचे सच्चे गुरु असतात.उदाहरणार्थ द्रोण- अश्वत्थामा, व्यास- शुक किंवा आजच्या काळातील डॉक्टर, वकील, इंजिनीअर,प्राध्यापक, तहसीलदार,प्रांत, हॉटेलवाला, बारवाला,इत्यादी पितापुत्र. झालेच तर संस्कृतमध्ये म्हणच आहे (म्हणे ) की बापाचे जोडे मुलाला येवू लागले की बापाने त्याला मित्रासारखे वागवावे म्हणून ! Post -- modernistic इश्टाइलने म्हणावयाचे तर आपला गुंडापुत्र बापाला जोड्याने मारण्याच्या लायकीचा झाला की त्याला समानतेचा दर्जा द्यावा; उदाहरणार्थ King Lear अर्थात नटसम्राट या नाटकांमध्ये respectively शेक्सपीअर व कुसुमाग्रजांनी हे दाखवून दिलेच आहे ) पिताश्रीच (किंवा त्यांचे पिताश्री .. .. हिन्दी सीरीयलच्या लँग्वेजमध्ये ' दादाश्री .. .. ' ) जर दारुकाम करीत असतील तर त्यांनी हे प्रशिक्षणाचे काम व्रत म्हणून अंगावर घ्यावे . विशेषतः पोटावर घ्यावे (तरच त्यांच्या उत्तरायुष्यात मुले / नातवंडी दारुडी न बनल्याचे समाधान व श्रेय मिळेल ). जर पिताश्री नसतील तर ज्येष्ठ बंधु ; ते ही नसतील तर कनिष्ठबंधू , मग जामात, मग क्रमवारीनुसार काका, मामा , चुलत, मावस नातेवाईक चालतील. हे झाले घरातले. घराबाहेरचे म्हणजे सख्खे शेजारी , जरा पलिकडचे काका , मामा चालतील.नाहीतर किमानपक्षी , गेलाबाजार वर्गमेहुणा , वर्गकाका, वर्गमामा,वर्गभाऊ , वर्गजामात इ.मंडळी अथवा फारच नाईलाज झाला तर जातभाई हे हक्काचे प्रशिक्षक समजावेत .

*अट एकच : या सगळ्यांवर आपला विश्वास असला पाहिजे.*

## महिला प्रशिक्षक - एक स्त्रीमुक्तीवादी दृष्टिकोन

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



प्रशिक्षण केवळ पिताश्रींकडूनच (म्हणजे पुरुषांकडूनच )दिले गेले पाहिजे,असे नव्हे तर मातोश्री व इतर ज्येष्ठ,पण अनुभवी महिला नातेवाईकांकडूनही ते दिले जावू शकते.यात कोणताही लिंगभेद ( no gender biasness ) नाही .शक्यतो आई असेल तर उत्तमच .' माझी आई माझी गुरु ' या विषयावर जगातील व भारतातील थोर थोरजनांपासून आजच्या कोणत्याही थोडेसे यश मिळविलेल्या सेलेब्रिटीपर्यंत सर्वांनीच जाहीरपणे आईचे आभार मानण्याची , टाहो फोडण्याची पध्दत सुरु झाली आहेच आता. (हे खरे मातृत्वाचे emotional marketing आहे.याविरोधात अद्यापि कोणत्याही Women's Lib.ने कसा आवाज उठवला नाही , कोण जाणे ! खरे तर त्याच जाणोत !!! Mother's Day ने तर मातेचे महत्व भारतीयांना , विशेषतः नवमध्यमवर्गीयांना अलिकडेच कळू लागले आहे.मागच्या पिढीत एक साने आडनावाचे गुरुजी होते . त्यांनी ' श्यामची आई ' नावाचे एक पुस्तक लिहीले होते.त्यामुळे त्या पिढीला घरगुती आईचे महत्व कळाले होते. गुरुजी गेले , सुदैवाने शाम आहे अजुनी . पुण्यातच राहातो.शनवारवाड्यासमोरच म्हणजे जरा तिरक्या दिशेला = वाड्याकडे पाठ करुन उभे राहिल्यास उजव्या हाताला थोडेसे पुढे मंगल टाकीजचा नवा पुल सुरु होण्याच्या आधी कसब्यात घुसतानाचे घर ! ) मावशी , काकू, आजी, पणजी , मामे,चुलत , आतेबहिण , इ.इ.सुध्दा प्रशिक्षक म्हणून चालतील.त्या नसल्याच तर शेजारच्या माम्या, काकवा , मानलेली मोठी बहिण , मानलेली वहिनी इत्यादी ' व. प्र.' प्रकारानुसारच्या बायका चालतील.

## Mock Party व त्रिज समारंभ

आजकाल ज्यांना अभ्यासक्रमात प्रात्यक्षिके नसतात अशा राज्यशास्त्र , समाजशास्त्र , अर्थशास्त्र , तत्त्वज्ञान इत्यादी सामाजिक शास्त्रांनीही प्रात्यक्षिकांचा हव्यास धरला आहे(युजीसीचा तसा बांबू आहे.). त्यातूनच mock assembly , mock parliament , mock court अशी खुळे सुरु झाली आहेत. त्यानुसार मद्यप्रशिक्षकाने विद्यार्थ्यांच्या पालक यजमानांकडून भावी विद्यार्थ्याला *'अथातो तीर्थ जिज्ञासा '*म्हणून आधी एक mock party द्यावी , या party ला यज्ञविधीचाच दर्जा द्यावा .त्यांनतरचा प्रशिक्षणाचा शुभारंभ सनातन तंत्रमार्गातील सुरादेवीच्या गायत्रीमंत्राने तिचे स्तवन करुन ' बटू / णी ' च्या मद्यजीवनाचा श्रीगणेशा करावा. या party ला घरातील सगळ्यांनी मुंजीला यावे तश्याच धार्मिक भावनेनेच यावे . यानंतर सबंधित ( ' to whom so ever it may concern ! ' forever !! स्टाईलने ) 'बटु' ला किंवा 'बटूणीला ' यथासांग मद्यजीवनासाठी शुभेच्छा द्याव्यात.पाहुण्यारावळांनी त्या प्रशिक्षार्थीला व त्याच्या आईवडिलांना , त्या कुटूंबालाच वेगवेगळ्या प्रकारच्या दारुच्या बाटल्या भेट द्याव्यात.त्याचे रुखवत मांडण्यात यावे.त्यांच्याकडे फ्रीज नसल्यास क्रीमी लेयरवाल्या पाहुण्यारावळ्यांनी व आप्तेष्टांनी ( तिथे समारंभात सगळ्यांसमोर परस्परांत न भांडता ) मुकाट्याने आधीच वर्गणी काढून या यजमान कुटुंबास फ्रीज द्यावा .रुखवतातील एवढ्या दारुच्या बाटल्या पाहून ' बटु / बटूणी ' हरखून जातील व आता ' कित्ती मज्जा ' म्हणून स्वप्नात हरवून जातीलच , पण त्यामुळेच Adult झाल्यावर लगेच एवढ्या चिकार दारुच्या बाटल्या पाहून त्यांना प्रथम क्षणापासूनच 'दारुचे वाटणारे आकर्षण कमी' होईल.म्हणजेच सुरुवातीपासूनच त्यांचे दारुपान नियंत्रणात राहील .

पारंपरिक मौजीबंधनात बटु / बटुणी 'द्विज' होत असल्याने या 18 व्या वर्षी वयात आल्यानंतच्या मद्यपान प्रशिक्षणाच्या समारंभाचे *' त्रिज'* असे नामकरण करावे .कारण दारु पिवूनही दारुची सवय न लागून बटू जिवंत राहतो / बटूणी जिवंत राहते आणि नवे ***नवसागरयुक्त*** जीवन आनंदाने जगते , हा एक प्रकारे नवा जन्मच आहे. दुसऱ्या भाषेत दारुचा स्पर्श होवूनही जगत असलेलेच विद्यमान जीवन पुनर्जन्मासारखे भासते. हा तिसरा नवा जन्म समजून या समारंभास हे नवे 'त्रिज'[5] नाव द्यावे . त्रिजसमारंभानंतर *'सोडमुंज'* उतारवयात आपोआपच (पिणे झेपत

[5] एकूणच हिंदुधर्मशास्त्रात ; विशेषतः म.म.काणे यांच्या ' धर्मशास्त्राचा इतिहास ' या जगत्मान्य पुस्तकाच्या पुढच्या आवृत्तीत [ आताची आवृत्ती सावकाशीने पुढील पाश्शे वर्षात सगळी खपली की ] जे नवे अत्याधुनिक आचारविचारांचे संपादकमंडळ येईल ते माझ्या या नव्या शोधाचा समावेश करतील , अशी आशा करण्यास मला अवकाश मिळेल काय ? )

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



नसल्याने ) यथासांग होईलच म्हणा ! (या सगळ्या प्लॅनिंगमुळेच ' बलसागर भारत होवो' या गीताच्या धर्तीवर "नवसागर भारत होवो ब्रह्माण्डात शोभुनी राहो " असे नवे गीतही रचता येईल.)

## बटू / विद्यार्थी कोण असावेत ?

जसे प्रशिक्षकात लिंगभेद नाही तसेच प्रशिक्षणार्थींमध्येही लिंगभेद नसावा.मुलग्यांना व मुलींना सारख्याच दर्जाचे व एकच अभ्यासक्रम असणारे प्रशिक्षण दिले जावे. फक्त एकच भेद करावा जो अतिशय आवश्यक आहे; तो म्हणजे गर्भवती असताना या नवमातेने दारुकाम केल्यास कोणते तोटे तिला व बाळाला होवू शकतात याची कठोर वैद्यकीय जाणिव तिला करुन दिली जावी.यात हयगय करु नये.

सरकारी नियमानुसार प्रशिक्षणार्थींचे वय 18 + च असले पाहिजे, याची सदाखला कठोर जाणिव प्रशिक्षकाने स्वतःला व ज्ञानकामुक (Epistemically sexual ? की Sexually epistemic ??? !!! ) शिष्याला करुन द्यावी. प्रशिक्षक जर दस्तुरखुद्द आईवडिल व जवळचे नातेवाईक असतील तर दाखल्याची गरज नाही.पण त्यांच्या व्यतिरिक्त तज्ञ प्रशिक्षकाची गरज भासली तर त्याने प्रशिक्षणार्थी नवजवान वा नवजवानीस दाखला कंपलसरी असावा. तो फोटो दाखला असावा.कमी वय असूनही कुणी गोच्या करु नये म्हणून तो दाखला लॅमिनेट केलेला असावा.प्रांताधिकारी , तहसीलदार , एन.सी.सी.अधिकारी सारख्या सक्षम अधिकाऱ्यांकडून ॲटेस्टेड केलेला असावा. दाखल्यावर शक्यतो मुख्याद्यापक अथवा प्राचार्य यांचे ॲटेस्टेशन शाळा - कॉलेजच्या सीलसह असावेत.हा दाखला फेरतपासणीसाठी पुन्हा त्या सक्षम अधिकाऱ्याकडे पाठवावा.या प्रक्रियेची यथासांग जबरी फी आकारावी.

## *(2 )* परिविक्षाकाल

एकदा प्रशिक्षण संपले की विद्यार्थ्यांचा ( यात विद्यार्थीनी आल्याच ! ) परिविक्षाकाल सुरु करुन द्यावा.त्यासाठी 'स्वकामाईचीच पिणे ' पहिली अट घालावी .प्यायल्यानंतर तो नक्की व्यवस्थित व भरपूर जेवेल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे .यानंतर त्याच्या वाढत्या वयामुसार त्याला स्वातंत्र्य बहाल करावे.कायद्यानुसार तो जाणता नागरिक असल्याने त्याला परवाना मिळवून देण्यात मदत करावी .त्याच्या स्वकमाईच्या मद्यजीवनाची सुरुवात झाली की त्याच्याशी दारुकामाबाबत असलेला भावनिक संबंध खटकन् तोडून टाकावा.नाहीतर या पिळग्यांना आईबापाला emotional blackmail करण्याच्या सवयी लागू शकतात.मात्र अधेमधे त्याच्यावर लक्ष ठेवावे , जास्त पित असल्यास सावधानतेचा इशारा द्यावा . अन्यथा ' तो स्वतःच त्याच्या पुढच्या पिढीचा चांगला भावी प्रशिक्षक होवू शकणार नाही , मग ही गुरु-शिष्याची पवित्र , वैदिक Spiritual परंपरा चालविण्याचा नैतिक अधिकार त्याला राहणार नाही ' याची नम्र जाणिव करुन द्यावी .

## [B] दारुचे पुराणशास्त्र व अध्यात्मशास्त्र

दारु ही सर्व प्रकारच्या धर्मसंप्रदायात अध्यात्मिक बाब आहे.म्हणूच तिला इंग्रजीत Spirit म्हंटले गेले आहे.(अपवाद फक्त इस्लामचा.इस्लामला मद्य, जुगार व कर्ज ,व्याज ,वेश्या या संकल्पनाच मान्य नाहीत. ) Spirit या शब्दापासूनच Spiritual हा दुसरा इंग्रजी शब्द बनतो. त्याचा अर्थ अध्यात्मिक असा होतो.Spirit म्हणजे आत्मा .त्यामुळे आत्म्यासंबंधात ते आत्मिक किंवा अध्यात्मिक , असा अर्थ करता येईल.अध्यात्म ही एक अतिशय भावुक आणि कोणत्याही भाबड्या जीवजंतूला व्याकुळ करणारी बाब असल्याने तिच्याबाबतीत ' फार खरे बोलणे ' उचित ठरणार नाही.

पण अध्यात्मात ईश्वरभक्ति मात्र असते. ईश्वर हा भक्तिचा (बर्वे वगळता)भुकेला असतो. एका अर्थाने भक्ति ही सुध्दा एक नशा आणणारीच बाब आहे. त्यामुळेच की काय कोण जाणे पण दारुला spirit म्हंटले गेले असणार.( म्हणून तर विश्वकोशातील नोंदी Sprited liquer असा प्रकार सांगितला असावा ).झालंच तर कार्ल मार्क्स नावाच्या

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

एका जागतिक विद्वानाने 'धर्म ही अफूची गोळी आहे ' असे म्हंटलेच आहे.[6] अफू व दारु या धुंदी आणणाऱ्याच गोष्टी आहेत. धर्म व दारु त्यामुळे समांतर ठरतात.मार्क्सच्या या धर्मवचनाचा दारुला आधार आहेच किंवा नसला तर देता येईल ,एवढे काय त्यात ?

ईश्वरप्रधान धर्मातील भक्ति व दारु यांचेही काम एकच आहे. ते म्हणजे भक्तिमार्गातील सेवकाला किंवा मद्यसेवन करणाऱ्याला एका अशा उंचीवर न्यावयाचे की तिथून त्या सेवकाचा या भौतिक जगाशी असलेला संपर्कच तुटावा. तसे घडतेही.भक्त व दारुप्रेमी दोघेही नशेत चूर झाले की त्यांचा या जगाशी संपर्कच तुटतो.उदाहरणार्थ मीरा, तुकाराम , नामदेव, गोरोबा,इ.इ.ची जीवनचरित्रे वाचा.किंवा दारुक्षेत्रातील कोणताही नवाजुनापुराणा तळीराम घ्या .दारुचे भक्तिशी असलेले लक्षात घेवूनच की काय कोण जाणे पण ठाणे शहरातील एका देशी दारुच्या दुकानाचे नावच मुळी *' भक्ति मंदिर '*असे ठेवलेले मला आढळले.



## दारुचे धार्मिक महत्व : समुद्रमंथनातील चौथे रत्न

हिंदु धर्मशास्त्र व पुराणशास्त्रानुसार तर दारुला जबरीच महत्व आहे. समुद्रमंथनाच्या कथेनुसार दारुला चौदा रत्नांमध्ये मानाचे स्थान आहे. अगदी प्राईम लोकेशन आहे ! *समुद्रमंथन* कथेनुसार देवदानवात इतकी घमासान घनदाट युध्दे झाली की डायरेक्ट प्रलयच झाला.त्यामुळे सगळे काही वाहून गेले .समुद्राने पृथ्वीवरचे जे होते नव्हते ते सगळेच गिळूनच टाकले. स्थावर मालमत्ता तर गिळंकृत केलीच पण देवदानवांच्या विविध प्रकारच्या शक्ती, त्यांचे दणकेबाज जादुई मंत्र सुद्धा ही गिळंकृत केले.सगळी एकच बोंबाबोंब झाली. म्हणजे थेट तुकोबारायांच्या "झाला प्रेतरूप शरीराचा भाव .. .. .. महावाक्य ध्वनी बोंब झाली " फेम बोंबाबोंब झाली !! अहो, पृथ्वीवर 'जीवन' (लाईफ Life) नावाची गोष्टच उरली नाही. *जगायचे कसे?* हा भलताच प्रश्न पडून गेला.

मग (झक मारीत ) देवदानव एकत्र आले.उभयपक्षीय चिंतनशिबीर भरविण्यात आले.(मांडवली हो गयी बा ऽ प ! )चिंतनातून एक कॉमन अजेंडा फायनल असा झाला की समुद्राला विनंती करण्यात यावी व जीवन सुरु करण्याची प्रार्थना करावी. मग मांडीला मांडी लावून (मूळ अर्थ अश्लील वाटेल बर कां!) बसून तशी प्रार्थना केली गेली . पॉलिसी स्टेटमेंट तयार करण्यात आले. समुद्राची चांगलीच लाल करण्यात आली, तोही बावळ्यासारखा लगेच प्रसन्न झाला.त्याने मोठ्या उदार अंतःकरणाने मंथन करण्याची व गिळलेल्या वस्तू परत करण्याचे वचन दिले.(एकत्र येवून विचारमंथन करण्याचे फळ पाहा कसे चांगलेच निघते.राजकीय पक्ष या कथेतून धडा घेतील काय ? चिंतन शिबीरातून एकी साधायला हरकत नाही.)

पण समुद्रमंथन ही काय चेष्टा नव्हती.(महाराजा !! ) समुद्र घुसळण्याएवढा मोठा रवी शोधण्यापासून सुरुवात झाली. तो मिळेना. शेवटी *मंध्याचल* नावाच्या पर्वताची रवी करण्यात आली.या पर्वताला वेढण्याइतपत प्रचंड लांबीरुंदीजाडीचा दोर नव्हता.मग शोधाशोध सुरु झाली.शेवटी या अटी पूर्ण करणारा सापडला तो एक नाग.तो नागांचा राजा होता.वासुकी ! मग (पुन्यांदा झक मारीत मारीत .. ..) त्याचे पाय धरुन त्याला मनवण्यात आले. (कुठे असतात बरे सापाचे पाय ? ) पर्वताची दोरी होण्यास तो राजी झाला. या वाइया सापाची दोरी[7] करण्यात आली. पण मंथन करताना रवी बूडू लागल्याने (पुन्हा दैवी झक मारीत ) विष्णुनेच कासवाचे रुप घेवून तिला आधार दिला.

---

[6] गेला बिचारा ! बरं झालं ते म्हणा.तत्त्वज्ञाने मेलेलेच असावे हा नियम पाळणारा हा तत्वज्ञ.

[7] दोरीच्या ठिकाणी साप बघण्याची अद्वैत वेदान्तिक पध्दती म्हणजे रिसर्च मेथडॉलॉजीची शिष्टम- या केवळ उदात्त मायिक देवकार्यासाठी सोडून देवून खऱ्याखुऱ्या सापाची खरीच दोरी करण्यात आली. सापाने रवी घुसळता येते का हे मी स्वतःच एकदा; - मेलेला साप ज्ञ हो, मेलेला साप घेवून - प्रयोग केला होता .निष्कर्ष सांगत नाही पण तुम्ही हा प्रयोग करायला हरकत नाही .फार तर मला पुचाट, भेकड, गांडू समजून तुम्ही जिंवत साप घ्या ! मला जास्त पुचाटोत्तम समजायचे असेल तर तुम्ही विषारी साप घ्या . घुसळा, मग मला बोलवा - येतोच 'मजा बघायला' ! )

मंथन सुरु झाले.पहिल्यांदा बाहेर आली ती लक्ष्मी.दुसरे आले ते कौस्तुभ नावाचे रत्न , तिसरे आले ते पारिजातकाचे झाड . चौथ्या क्रमांकावर आले ते सर्वांना प्रिय असलेले मद्य ! त्यानंतर आरोग्यरक्षण करणारा धन्वतंरी अन् शेवटी आले ते अमृत .(अमृत आल्यानंतर ती कुप्रसिध्द अशी मोहिनीकथा जन्माला आली .)

पुराणकथा , तंत्रविद्या यानुसार मद्याला ' सुरा ' असेही नाव आहे. सुरा ही लक्ष्मीची मोठी बहिण समजली जाते.(काय बहिणीबहिणी आहेत पहा ! ).मंथनात सुरा ही लक्ष्मीनंतर निघून , उशीरा जन्माला येवून सुध्दा ती लक्ष्मीची मोठी बहिण मानली गेली.यातच तिचे महत्व आहे. सुरा हे व्यसन तर लक्ष्मी ही व्यसनपूर्तीचे साधन.व्यसनावर उपाय तो धन्वंतरी इत्यादी सगळे एकत्रच बाहेर आले .म्हणजेच मानवी संस्कृतीची सुरुवात अन् विनाशाचा श्रीगणेशा एकत्रच.



## महाकाव्यातील सुरादेवी महात्म्य

या व अशा इतर काही पुराणकथांमधील मद्यजन्मकथेचा ' हँग ओव्हर ' की काय म्हणून तंत्रशास्त्र , रामायण , महाभारतातही सुरादेवीचे महात्म्य वर्णन केलेले आहे. रामायणात चांगलेच मद्याचे उल्लेख आहेत तर महाभारतात कृष्णार्जुनांच्या,भीमाच्या व कौरव इत्यादींच्या आणि यादवीतील यादवांच्या मद्यधुंद धिंगाण्याचे (सुरा ) रसभरित वर्णन महर्षी व्यासांनी केले आहे .शिवाय मार्कंडेय पुराणात ' योगीराज दत्त संसारकथा' या कथेत तर चक्क श्रीमान दत्तोबा उर्फ त्रितोंडी दत्तात्रय महाराज एका सर्वांगसुंदर तरुणीसह मद्यपान करीत असल्याचे उल्लेख आहेत.ऋग्वेद, यजुर्वेदात मद्याचे उल्लेख ही आहेत .रामायणातही श्रीलंकेतील मदिरागृहांचे वर्णन महर्षी वाल्मिकींनी केले आहे. या मदिरागृहांना '*पानभूमी*' म्हंटले जाते .

थोडक्यात, काय तर भारतीयांच्या मानसातच मद्य इतके भिनलेले आहे की दारूचे समाजात असणे व त्याचे अंमल करणे ,त्याचे भलेबुरे परिणामकारक अस्तित्व आता शांतपणे स्वीकारणे हेच 'अत्याधुनिक शहाणपणाचे' (Post - Modernistic Wisdom ) ठरेल .(मद्याचा अनुषंग म्हणून कामाचा उल्लेख केलाच पाहिजे.वेद - पुराणांमधील ब्रह्मदेवापासून किरकोळ कारकोळ देवदेवतांचे कामजीवन व त्यांचे अनिर्बंध लैंगिक संबंध यावर तर अनेक पीएच.ड्या. होतील. पण जाऊ द्या झालं ! 'आपलेच दात अन् आपलेच ओठ' या प्राचीन वैदिक म्हणीनुसार 'आपलेच देव आपलेच कामजीवन' असे नाईलाजाने असे म्हणावे लागते. खरे तर देवांची रंडीबाजी हा वेगळाच विषय आहे. अगदी वैषयिकच विषय!)

मद्यमहात्म्य जगातील सर्वच संस्कृत्यांमध्ये आहे.ते इतके टोकाचे आहे की जगातील सर्वच धर्मधुरिणांना मद्याला धर्मपरंपरेत खास जागा द्यावी लागली (पण स्ट्रिक्टली स्पिकींग इस्लाम वगळता ).मद्याला अध्यात्मिक व धार्मिक महत्व आल्यामुळेच त्याला इंग्लीशमध्ये Spirit म्हंटले गेले असणार ! इंग्लीशमधील Spirit चा अर्थ चैतन्य , आत्मा असा आहे. शिवाय तो एक रासायनिक पदार्थ व संकल्पना आहेच ! मद्यपानानंतर एक प्रकारची तरलता, चेतना अंगी येतेच (किंवा चक्क ब्रह्मानंदी टाळी लागते.अध्यात्मातही तसेच घडते.म्हणून तर भक्तीभावनेलाही एक प्रकारचे मद्य म्हंटले जाते, ते उगाच नाही राजे !)

## वेदांमधील मद्यमहात्म्य

पवित्र हिंदुधर्मानेही केवळ पुराणशास्त्रातच नव्हे तर खुद्द , थेट वेदांमध्ये सुध्दा मद्याला चांगलीच जागा दिली आहे. भरपूर एन्ट्र्या आहेत.( वैदिक पदानुक्रम कोश ' वाचा ! एक हूकूम .) वैदिक साहित्यानुसार पवित्र यज्ञयागविधींमध्ये देवांना आहुति देण्यासाठी हविर्द्रव्य म्हणून सुध्दा सुरा उपाख्य दारुचा वापर केला जातो. वाजपेय व सौत्रामणी अशा दोन यागांमध्ये सुरेचा उपयोग हविर्द्रव्य म्हणून होतो. मराठीत सोमपान हा 'मद्यपान' या अर्थाने वापरला जात असला तरी तो योग्य नव्हे. कारण सोम म्हणजे दारु नव्हे. सोम हे सामर्थ्य देणारे पेय आहे.सोम व मद्य या दोन्ही गोष्टी एकच असण्याबाबत एकमत नाही. तांदूळ व सातू यांची बनते ती 'सुरा '. फुले व गवत इत्यादीपासून बनते ती 'परिसृत ' , एकदल धान्यापासून बनविले जाते ते ' किलाल ' , तांदूळ व मसाल्याचे पदार्थ यापासून बनते ते

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरुन संपर्क : 9226563052

'मासर' गुळापासून ' बनते ते 'मैरेय ' ; खजुरापासून तयार होते ती 'खर्जूरा' आणि 'वारुणी ' तसेच 'आसवे व अरिष्टे' हे द्रवपदार्थही औषधीमद्ये म्हणून ओळखली जातात.

झालंच तर कौटील्यीय अर्थशास्त्रात मेदक , प्रसन्ना , आसव , अरिष्ट, मैरेय ,व मधु हे मद्याचे प्रकार सांगितले आहेत. आसव म्हणजे जुने मद्य. सोमपानसेवनाने धुंदी येत नाही.वैदिक साहित्यात सोमपानाची स्तुति आहे तर सुरापानाची निंदा आहे.'सुरा ' ही समुद्रमंथनातले चौथे रत्न असूनही तिची निंदा केली आहे. याचा अर्थ त्या काळात अतिरिक्त सुरापानाचे वाईट परिणाम भोगावे लागले असणारच.त्यामुळे हे पवित्र मार्गदर्शन समोर ठेवून आपण जे 'पोष्ट- मॉडर्निस्टीक ' लोक आहोत त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करुनच केवळ 'व्यसन न लागताही सुरापानाचा आनंद मिळविण्यासाठी' (' निंदकाचे घर असावे शेजारी ' या पुन्हा पवित्र वैदिक म्हणीनुसार चांगली भावना मनात राखूनच ) हा 'त्रिज यज्ञयाग ' मात्र यजमानाने विद्यमान व मृत्यूत्तर जीवन समाधानी असण्यासाठी आनंदाने तनमनधन ओतून करावा.



## [C] दारुकामाची सामाजिक नीती

जीवनातील गुंतागुंत वाढली की त्या त्या जीवनविषयक अंगाचे व त्या क्षेत्राचे वेगळे स्वतंत्र नीतीशास्त्र तयार करावेच लागते.हे नीतीशास्त्र व्यापक अशा सर्वमान्य नीतीशास्त्राशी सुसंगत ठेवूनच ते बनविले जाते.याला 'उपयोजित नीतीशास्त्र '(Applied Ethics) असे म्हटंले जाते. समाजातील कोणकोणत्या विद्यमान ज्वलंत प्रश्नांना कोणत्या भूमिकेतून सामोरे जावे, याचे मार्गदर्शन करणारा Encyclopaedia of Applied Ethics नुकताच प्रसिध्द झाला आहे.त्यात Envoirnmental Ethics , Medical Ethic, Business Ethics , Ethics and Sex ,Ethics and Politics इत्यादी शेकडो नोंदी आहेत.जीवनाची जी जी अंगे विकसित होतील तसतशी त्या क्षेत्राची नीती रचावी लागेल, अशी या विश्वकोशाची भूमिका आहे.

पण त्यातही दुदैवाने ' मद्यविषयक आचारसंहितेची ' एन्ट्री नाही ! पण दारुने सर्वत्र गंभीर नैतिक समस्या निर्माण केल्यामुळे आज एका व्यापक स्वरुपाच्या दारुकामाच्या आचारसंहितेची गरज आहे. आपण भारतीयांनी ; त्यातही महाराष्ट्रीयनांनी ती तयार करण्यात पुढाकार घेणे दूरदृष्टिचे व फायद्याचे ठरेल. त्यामुळे आपल्या आचारसंहितेला स्थानिक बाजारपेठ मिळेलच , पण International Market ही मिळेल.त्यासाठीच मोठ्या हिरीरीने 'दारुकामाच्या नीतीशास्त्रा' ची रचना करावी लागेल,किंवा अस्तित्वात असलेल्या काही नियमांना सुवव्यस्थित रुप (articulation) द्यावे लागेल.त्याची सुरुवात अशी :

## *(3) स्वतंत्ररित्या दारुकाम करण्याचा टप्पा*

## अर्थात

## [अ] दारुजीवनातील नीती : व्यक्तिगत बाजू

**(a)** अभ्यासक्रम व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर दारुजीवनाचा श्रीगणेशा करणाऱ्या नवशिक्याने (novice) तो स्वकमाईनेच करावा. याची काही कारणे :

1.पहिले कारण म्हणजे कमी प्रमाणात प्यायली जाते. त्यामुळे आरोग्याचे ( आपल्या व आपले मानलेल्या काहीजणांच्या
आरोग्याचे सुध्दा ) रक्षण होते.

2. दुसरे , स्वकमाईचीच प्यावयाची असल्याने आपल्याच पैशाची बचत होते.

3. तिसरे ,खूप प्यायल्यावर न जेवण्याकडेच कल होतो. त्याऐवजी कमी प्यायल्याने जेवणही व्यवस्थित होते.

4. चौथे , कमीच प्यायल्यामुळे सकाळी (किंवा पिवून झोपून उठल्यानंतर कधीही) 'वरटांगीभाव ' ( hang over) राहात नाही. परिणामी पुन्हा 'उतारा' घेण्याची गरज राहात नाही.

5.कमीच प्यायली गेल्याने व्यसन लागण्याची शक्यता फारशी उरत नाही.
6.कमी प्यायल्यामुळे रोज पिता येते.साहजिकच खरा मद्यानंद आमरण मिळविता येतो.

**(b)** स्वकमाईचीच प्यावयाची असल्याने पहिल्या पेगपासूनच खिशाला परवडणारीच प्यायली जाते. तरीही त्यातल्यात्यात आपल्या सामाजिक ,आर्थिक व बौध्दिक दर्जानुसार दर्जेदारच प्यावी.

**(c)** इतरांबरोबर पिण्याची वेळ आल्यास म्हणजेच पार्टीला जाण्याची वेळ आल्यास शक्यतो 'जवान पध्दती' (soldier system ) वापरावी.यालाच मराठीत TTMM ( 'तुझं तू माझं मी' चे लघरुप ) म्हणण्याची परंपरा आहे. या पध्दतीचे फायदे असे :

1) कुणावरही बोजा पडत नसल्याने सगळेच आनंदात असतात.
2) आपल्याच खिशाला चाट बसत असल्याने कमी प्यायली जाते .(रोज मरेपर्यंत...।। ध्रुवपद ।। )
3) असलेले मित्र दुरावत नाहीत. उलट नवेनवे मित्र जोडले जातात. चीनी भाषेत म्हणच आहे ना -- "समान शीलेषू व्यसनेषु सख्यम् . . .."



## [ब ] दारु व मैत्री : सामाजिक बाजू

समान शीलेषु व्यसनेशु सख्यम् या सनातन ,धार्मिक म्हणीनुसार नवे मित्र जोडले जातील, जुने जास्त घट्ट होतील, (पध्दतीशास्त्र : TTMM येथे पुन्हा वाचावे .) दारु ही मित्र जोडण्याची अगदी सनातन स्वरुपाची जागतिक भाषा आहे. तिला संस्कृती , धर्म , भूगोल इत्यादी सीमा नाहीत. ती खऱ्या अर्थाने ' फ्रॉम लोकल टू ग्लोबल ' दर्जाची भाषा आहे. तत्त्वज्ञान व साहित्यातील Post - Modernism च्या Theory नुसार ती ओरिजिनली जागतिक भाषा आहे. तिच्यावर कुणाचे पेटंट नाही , खासगी मालकी नाही. ती मूलतः सार्वजनिक आहे.त्यामुळे ती मैत्रीला अतिशय पोषक आहे.

## [क ] दारु व नातेसंबंध : कौटुंबिक बाजू

दारुकामामुळे नातेसंबंध पार अन् फारच बिघडून जातात.विशेषतः घराण्यातील दिवटे चिरंजीव जर दारुडे झाले (हे संबोधन आदरार्थी आहेच पण अनेकवचनीही आहे.)झाले तर मायमाऊलीला दुःख होतेच पण फादर्समंडळी चिडून कावून जातात.नवरा दारुडा झाला तर बाईच्या संसाराचा विचका होतो.हे सर्वच दरिद्री, कर्मदरिद्री ,गरीब ते श्रीमंत , कर्मश्रीमंत ,गर्भश्रीमंत ,वीर्यश्रीमंत / शुक्राणूश्रीमंत व स्त्रीबीजांडश्रीमंत घरापर्यंत समान चित्र आहे.यावर एक उपाय आहे .

1) उदाहरणार्थ : नवऱ्याची दारु सोडण्यासाठी बायकोने काय करावे ?
2) मुलाने दारु सोडावी , यासाठी मायमाऊलीने काय करावे ?
3) मुलाने दारु सोडावी, यासाठी पिताश्रीने काय करावे ?
4) जावयाने दारु सोडावी, यासाठी सासूसासऱ्याने काय करावे ? (शक्य तो सासऱ्याला वगळावेच .कारण तो लेकाचा पित असण्याची शक्यता असतेच .नसेलच पित तर आनंदाची गोष्ट आहे.)

याच धर्तीवर बहिणीने भावाची , मेहुणीने भाऊजींची , भावाने भावाची , काकाने पुतण्याची , मामाने भाच्याची ,, मित्राने मित्राची, मैत्रिणीने मित्राची दारु सोडण्यासाठी काय करावे , हे ठरविता.येईल.वेगवेगळी permitation and combination नुसार कुणी काय करावे , हे नात्यानुसार व त्या नात्याच्या , प्रेमाच्या तीव्रतेनुसार निश्चित करता येईल. त्याचे एक समान उत्तर म्हणजे ल.सा.वि. असा की *'संबंधित हितेच्छूने स्वतःच दारु प्यायला सुरुवात करायची '* .म्हणजे जावयाची किंवा मुलाची दारु सोडण्यासाठी मायमाऊलीनेच (सासूबाईंना '

प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे
**"दारु कशी पितात रे भाऊ ?" अर्थात मद्यपानाची आचारसंहिता**
श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



आई ' म्हणायची पध्दती अलिकडे पाडण्यात आली आहेच नाहीतरी .त्याचा फायदा घ्यावा.) पण यात अनेक complications and intricacies आहेत.त्याचेही पध्दतीशास्त्र, नीतीशास्त्र इ. अनेक बाजू आहेत .तो वेगळ्या लेखाचा विषय आहे.(संपादकांना धमकी ! )

## [D ] दारुसंबंधित आरोग्यशास्त्र

### अ ) शासकीय भूमिका :

नागरीकांनी दारुकाम करण्याविषयी कोणत्याही शासनाची भूमिका नेहमीच मॉडरेट राहात आली आहे .विशेषतः लोकशाही शासन लोकमताचा आदर करते. असे शासन नेहमीच ठार कठोर वास्तव लक्षात घेते व मगच आपली भूमिका मांडते ,जशी माननीय गणेश नाईक यांनी घेतली आहे, व नुकतेच माननिय शरद पवार यांनीही घेतली आहे .(भूमिका ! )

शासकीय भूमिका मुख्यतः नागरीकांच्या आरोग्याच्या रक्षणाची आहे.दारुमुळे शासनाला नेहमीच कायमचेच चांगले उत्पन्न मिळत आले आहे.(2004 - 5 च्या आर्थिक वर्षात म्हणे महाराष्ट्र शासनाला 2500 हजार कोटी महसूल मिळाला ! ) परवान्यात आरोग्यरक्षणाची ही भूमिका मांडण्यात आलेली आहे. (चौकट क्र. 1 पाहावी : हा परवाना हाच एक पुन्हा नव्या लेखाचा विषय आहे.! ? )

परवान्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे, याचा अैतहासिक आढावा विश्वकोशातील नोंदीत आहे.तो सर्वांनी जरुर जरुर वाचावा.

### ब )सामाजिक वास्तव भूमिका

मुळात मायबाप शासनाची भूमिका नागरीकांचे आरोग्य रक्षण असले तरी दारुचे व्यसनच लागलेच तर जठर , किडनी , स्वादुपिंड खराब होणे , मेंदूवर परिणाम होवून स्मरणशक्ति संपते.अनेक प्रकारचे भरम होत राहातात.थोडक्यात दारुड्याचे आरोग्य बिघडते.(मानसिक, आर्थिक , सामाजिक , राजकीय , बौध्दिक आरोग्यही फाफलते बरे ! ).पण त्याच्या कुटुबिंयाची ही वाताहत होते, मित्र दुरावतात.ते घडू नये यासाठीच तर दारुकामाचे प्रशिक्षण आवश्यक आहे, यात कोणताही शुध्दिवर असणारा व नसणारा सुजाण माणूस कबूल करेल . म्हणून तर मी दस्तुरखुद्द हा दीर्घलेखप्रपंच सुरादेवीकृपेने व तिची मैत्रिण असलेल्या सरस्वतीकृपेने करीत आहे.

### क ) दारुकाम व आहार

आरोग्य रक्षणाचा एक मुख्य मुद्दा म्हणजे दारुचा आहाराचाही असलेला घनिष्ठ संबंध . दारुकाम केल्यानंतर जेवण कमी जाते.त्यामुळे शरिराला आवश्यक पोषण मिळत नाही.त्याचप्रमाणे एक गैरसमज असा आहे की दारुकामानंतरचे जेवण हा compulsory मासांहरच असला पाहिजे. हे चुकीचे आहेच पण जठरावर ताण आणणारेही आहे.जास्त दारुकामामुळे जेवण होतच नाही,म्हणून योग्य प्रमाणात दारुकाम व दाबून शाकाहरीच जेवण हवे .

## [E ] दारुकामाचे अर्थशास्त्र

यात पेपरमध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश करता येईल.शिवाय कौटिल्यापासून ते अमर्त्य सेनपर्यंत अनेकांची मतेही अजमावून पाहता येईल .बाय द वे मला कौटिल्याचे माहित नाही पण नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्य सेन कसलाही गंड बाळगता चांगल्या दर्जाची वाईन पितात व गरीबांची काळजीही करतात.त्यामुळे गरीबांचे कसे होणार , असा उगीच टाहो फोडण्यात अर्थ नाही

***1) स्वतःचे व पाजणाऱ्यांचे बजेट***

दारुकामापूर्वी त्याचे बजेट काढणे गरजेचे आहे.आपण जर इतरांना पाजणार असू तर किती रोख पैसे जवळ असावेत , क्रेडिट असू द्यावे की नाही , कोणत्या कामासाठी कुणाला कोणती दारु पाजावयाची हे निश्चित करुन बजेट ठरविणे . तसेच इतरांकडून आपण दारु कोणत्याही कारणासाठी का होईना पिववून घेणार असू तर त्याचे बजेट जास्तीत जास्त कसे राहिल , ती पार्टी तिचे क्रेडिट कार्ड नक्की बरोबर घेते की नाही ,त्या कार्डाचे वैधव्य (validity) अजून आहे ना ,इ.इ. याचे प्रशिक्षण असेल.

### *2) दारुनिर्मितीचे अर्थकारण व अनुषंगिक उद्योगांची भरभराट*

या अभ्यासक्रमात दारुनिर्मितीची प्रक्रिया व तिचे विविध घटक , दारु व शासनाचे कर प्रत्यक्ष , हे कारखाने उभे करण्यासाठी करावे लागणारे कष्ट,तयारी , इ. मद्य निर्मितीचे मोठे उद्योग, छोटे उद्योग,कुटिरोद्योग, यांची माहिती असावी. तसेच घरगुती पातळीवर ही निर्मिती करणाऱ्यांना प्रोत्साहनपर योजना यांचाही समावेश असावा.कायदेशीर उद्योग सुरु करण्यासाठी शासन दरबारी किती गुंतवणूक ( पावतीची व बिनपावतीची ) करावी लागते, कोणत्या पातळीवर किती असते , यावर स्वतंत्र प्रकरणच करता येईल.

### साखर कारखान्यांचा सहभाग

या निर्मिती प्रकरणात साखर कारखान्यांच्या सहभागाचे एक स्वतंत्र प्रकरणच करता येईल.साखरेचे राजकारण , सत्ताकारण , अनुषंगिक वाङमयनिर्मिती , तमाशा इत्यादी लोककला , साखरशाळा , साखर पतसंस्था , साखरसंकुलाची निर्मिती, इत्यादींचा समावेश असलेले मोठ्ठेठेठे प्रकरण करता येइल.पीएच.डी.च्या प्रबंधांचा व त्यावरील पुस्तकांचा समावेश करता येईल . साखर कारखान्यांना आपल्या जीवनात अतिशय महत्वाचे स्थान आहे हे राज्य शासनाने त्यांच्या पुर्नवसनासाठी दिलेल्या दीड हजार कोटींच्या अनुदानाने सिध्द केलेले आहेच.मग पूरग्रस्तांचे काही का होईना.शिवाय साखर कारखानदारांवर तर गेली अनेक शतके सरकार व समाज अन्याय करीत आले आहे.अनेक साखरसम्राटांनी सरकारला अतिशय व्याकुळ होवून 'अल्कोहोल' चा वापर वाहनाचे इंधन म्हणून करण्याची योजना मान्य करण्याची याचना करीत आले आहेत.पण आपले मख्ख संवेदनाहीन सरकार त्यांचे कडे चक्क दुर्लक्ष करीत आले आहे. हा अन्यायच म्हंटला पाहिजे.

दारुनिर्मितीमध्ये फार मोठे अर्थकारण दडलेले आहेच .शासनाला थोडेसे का होईना पण मोठे उत्पन्न मिळते (वर स्पष्ट केलेच आहे किती कमी उत्पन्न मिळते ते ).शिवाय खूप मोठा नसला तरी समाजाचा निवडणुकीत निर्णायक ठरणारा हिस्सा या निर्मिती प्रक्रियेत गुंतलेला असतो. त्याला दुखावून चालत नाही.त्यामुळे देशी व विदेशी दारुनिर्माते , त्यांचे हितसंबंधी यांच्यात लपलेली अर्थव्यवस्था ही सुध्दा अभ्यासाचा विषय आहेच.त्यामुळे गावठी दारुनिर्मितीचे परवाने देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने नुकताच जाहीर केला , अमलबजावणीही सुरु केली .या सबंधात गावठी दारुनिर्मात्यांचे मुंबईत आझाद मैदानावर (होय , याच मैदानावर इतरही अनेक मागण्यांचे मोर्चे सातत्याने बसत असतात !स्वातंत्र्यपूर्वकालात स्वातंत्र्य चळवळीविषयक कार्यक्रम घडत ! ) धरणे आयोजित करण्यात आले होते. या अनुषंगाने दारुनिर्मितीतीलत धर्म ,जाती , लिंग या अंगानेही व Secular side ने (इथे Secular म्हणजे धर्मजातनिरपेक्ष व ऐहिकतावादी ' असे दोन्ही अर्थ अपेक्षित आहेत. भारतीय संविधानातही Secular चा अर्थ धर्मनिरपेक्ष असाच आहे.) अभ्यास करता येईल.

## कुष्ठरोग व महारोग निर्मिती उद्योग

दारु निर्मिती उद्योगात रोग्यांचाही या धंद्याला हातभार लागतो. उदाहरणार्थ विशेषतः गावठी दारुसाठी व बेकायदा विषारी दारुसाठी कुष्ठरोगी उपयोगी आहेत. पोलिसांच्या धाडी पडू नयेत, पडल्याच तर (अचानकपणे किंवा बहुधा पूर्वसूचनेनंतरच ) ते कुष्ठरोग्यांना पकडू शकत नाहीत. यासाठी कुष्ठरोग्यांची गरज पडते. त्यामुळे दारु

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



वाचते , पोलिसांना उत्पन्न मिळते , कुष्ठरोग्यांना काम मिळते , त्यांची उपेक्षा थांबते.त्यामुळे कुष्ठरोग घालविण्यापेक्षा कुष्ठरोग्यांची संख्या वाढविणे , नवे निर्माण करणे ,हाही प्रकल्प हाती घेता येईल.त्यांची लग्ने लावणे , त्यांची प्रजा वाढविणे, जास्तीत जास्त मुले असणाऱ्यांना विविध प्रकारची उत्तेजने देणे.नसल्यास समाजातून मुले - मुली पळवून त्यांना लसी टोचून नवे कष्ठिरोग्यांचे नवे भरभक्कम संरक्षक दल उभे करता येईल. हा ही एक उद्योग भरभराटीला येवू शकतो.

### *3) दारुचे वाणिज्यशास्त्र*

आजकाल कोणत्याही उत्पादनाचे वाणिज्यशास्त्रीय विश्लेषण केल्याशिवाय नफा मिळविता येत नाही. मार्कैटींगचे एकमेव सूत्र म्हणजे ' जास्तीत जास्त नफा मिळविणे ' हेच असते. हे उद्दिष्ट याही धंद्यात आढळते.याविषयीचा विशेष अभ्यासक्रम वाणिज्यशाखेतील तज्ञांकडून तयार करुन घेता येईल.पण निर्मिती , वितरण व्यवस्था , मार्केटिंग ,ग्राहकसंपर्क , ग्राहकसेवा , इत्यादी मुदद्यांचा समावेश करता येवू शकतो.संपर्कासाठी दारुनिर्मिती व वितरकांकडे मोबाईल इत्यादी क्षुद्र दर्जाच्या सेवा संपर्कासाठी उपयोगात आणल्या जातातच.आधुनिक वाणिज्यशास्त्रानुसार संपर्कयंत्रणाही स्वतंत्र उपग्रह सेवा सुरु करुन वापरता येईलच.

## [F ] दारुचे रसायनशास्त्र

दारु हे एक रसायन असल्याने त्याचे स्वतंत्र रसायनशास्त्र तयार करावे लागेल. कोणत्या प्रकारच्या दारुसाठी कोणती घटकद्रव्ये लागतील , त्या प्रक्रियेला लागणारी यंत्रसामुग्री , जागा इत्यादींची माहिती यात असावी. पण साधारणपणे दारुच्या निर्मिती प्रक्रियेचा ही काही कोणत्याही मासांपासून होत नाही हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे .मका, ज्वारी, गहू, कडधान्ये , आंबा, चिकू,संत्री, मोसंबी, बीट ,द्राक्ष , केळी ,कलिंगड ,इत्यादी शाकाहारी पदार्थापासूनच ती तयार होते.त्यामुळे दारुकामानंतर मटन, चिकनच खाल्ले पाहिजे हा गैरसमज आहे. अर्थात हे निर्मिती घटक चांगल्या दर्जाच्या दारुबद्दलची आहेत.

ज्यावरुन सध्या महाराष्ट्रात भयानक व भीषण वाद उफ़ाळले आहेत ती गावठी दारु मात्र मुख्यतः सडका घाणेरडा गूळ,चवीला व कडक धारेला चपला, बूट, वाहनांचे टायर्स , साप,उंदिर इ.प्राणी , वापरलेले बॅटरीसेल्स अशा बहुढंगी ,बहुरंगी पदार्थापासून बनतात. साप, उंदिर हे उग्र व मांसल अपवाद वगळता हे निर्मितीचे सारे घटकपदार्थ सुध्दा शाकाहारीच आहेत, हे दारुप्रेमींनी व आक्षेप घेणाऱ्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. ही दारु विषारीच असते असे नाही,पण करणाऱ्याच्या चुकीमुळे विषारी बनते खरी.ही स्वस्त असते. त्यामुळे गरीबांमध्ये ती जास्त खपते.ती पिवून काहीजण मेले की थोडाफार किरकोळ गदारोळ होतो , चौकशी , आयोग , एकादुसऱ्याला शिक्षा असे एखादे गंभीर नाटक होते , मग बाकी सगळे छान छान सुरुच राहाते. ते असो.चालायचेच .जगन्नाथाचा रथ आहे. थोडीफार चेंगराचेंगरी होणारच .

## [G] दारु व स्त्रीविषयक समस्या
## उर्फ महिलांचा मद्यपानप्रांतातील सहभाग उर्फ बाई बाटली संबंध

दारु पिण्याचा स्त्रीशी जोडला गेलेला संबंध चमत्कारीक आहे. शिवाय स्त्रियांचा या प्रातांतील सहभाग हा खरे तर वेगळ्या लेखाचाच विषय आहे .पण तो मी याच लेखात घेतो .(तो मोठा होईलच. पण असे म्हंटल्याने संपादकांना कापरे भरते कारण ते छोट्या लेखाच्या शोधात असतात किंवा मोठा लेख लगेचच लेखकाच्या लेखावर व काळजावर सुरी फिरवित निर्दयतेने छोटा करतात ) तो खऱ्याखुऱ्या ' विषयाशी ' संबंधित आहे. उदाहरणार्थ कोणत्याही दारुच्या जाहिरातीत ' बाई ' दाखविल्याशिवाय ती जाहिरात पूर्ण होवू शकत नाही . उदाहरणार्थ Adults only ही बीयरची जाहिरात पाहा (पाहा म्हंटलय ' प्या ' नव्हे ! )

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



दारुचा बाईशी दोन तीन प्रकारे संबंध जोडला जातो

## (अ) भारतीय बायकांना दारु का आवडत नाही ? अर्थात दारुच्या चवीचे मानसशास्त्र

भारतीय बायका दारु पित नाहीत याची अनेक कारणे आहेत.परवडत नाहीत,संसार उदध्वस्त होतात , परिणामी आयुष्याची बरबादी होते. इ.इ.किरकोळ कारणे आहेतच .पण मुख्य कारण असे आहे की मुलाची वा नवऱ्याची दारु सोडविण्यासाठी त्याची बरोबरी करण्यासाठी म्हणूनही त्यांनी दारुकाम करावयाचे ठरविले तरी त्या पिवू शकत नाहीत.कारण दारुच्या चवी फारच फालतू आहेत ! कडवट. तुरट , आंबट या काय चवी आहेत ? या असल्या घाणेरड्या चवीमुळे ती दारु रक्तात भिनून अंगालाही तसाच घाणवास येतो. कोणत्याही बायकोला, बहिणीला , आईला हे घाणवास आवडतील ? समजा याच चवी जर गोड , विविध फळांच्या असत्या , दारु जर सुवासिक असत्या तर या मायमाऊली व बहिणसाऊली दारु पिणार नाहीत काय ? पितील तर ! दारवा चांगल्या गोडसर चवीच्या केल्या तर भारतातील फार मोठा स्त्रीग्राहकवर्ग ही मिळू शकेल.दारवा सुवासिक नसल्यामुळे स्त्रिया दारु पित नाहीत , एवढेच !

दारु जर सुवासिक बनविता आल्या तर प्रशिक्षणास ही सोयीचे जाईल. दारुच्या चवीचे म्हणूनही काही मानसशास्त्र असते , हे लक्षात घेवून या सूचनेचा सरकारने व दारुनिर्मिकांनी (म.जोतिराव फुले आणि म.म. हरिभाऊ नरकेसाहेब यांच्या स्मरणार्थ ' निर्मिक ' हा शब्द वापरला आहे, ' निर्माता ' नव्हे .ईश्वर जसा या जगाची निर्मिती करतो तसे दारुनिर्मिकही एका वेगळ्याच जगात मद्यपिला घेवून जातात , म्हणून !! ) विचार करावा, ही नम्र विनंती.

## (ब) प्रत्यक्ष दारुपानातील सहभाग

साधारणपणे दारुपान ही पुरुषी दांडगाई असल्याने पुरुषच यात पुढारपण करणारे असतात.त्यामळे पार्टीला जातात ते पुरुषच.महिलांचा सहभाग यात दारु पिणाऱ्या नवऱ्याला, मुलाला , जावयाला प्राकृत भाषेत शिवीदान व त्यांतर त्याचे जोडे व ते जोडे ज्या पायात असतात ती अख्खी लाथ खाणे , या पुरताच मर्यादित असतो.पण जेंव्हा दारुपानात त्या प्रत्यक्ष सहभाग घेतात तेंव्हा तो अनुभव जास्तच तरल करणारा असतो. निदान आपल्या पवित्र वैदिक भारतीय जीवनपध्दतीत तरी . कारण पाश्चात्यांमध्ये महिलांचे दारुपान ही एक सहज स्वीकारली गेलेली गोष्ट आहे. त्यांच्या संस्कृतीत ते बसते.( त्यांच्यात बायकांनी बसलेले चालते - वा ! काय पण मराठी वाक्य आहे. बसलेले चालते म्हणे !!! ) आपल्या संस्कृतीत ते चालत नाही . तर बसते . म्हणजे बंद असते.(म्हणून चालते = बसते असे समीकरण बनते .)

दारुपान करणारी स्त्री हा आपला जिव्हाळ्याचा विषय बनतो.बायकोने आपल्याबरोबर दारु पिणे, हे नवऱ्याला फारच exciting वाटते तर मैत्रिणीने आपल्याच बरोबर दारु पिणे sexciting वाटते.हाँ आता जर का बायकोच मैत्रिण असेल तर दोन्ही वाटते. मैत्रिणच जर बायको झाली तर ती तेवढी exciting वाटेल असे नाही. (येथे ती म्हणजे बायको नव्हे तर दारु . व येथे म्हणजे येथे हा लेख वाचताना व तेथे खरोखरीच दारु पितानाही ) आता अशी दारु पिणारी मैत्रिण मिळणं हे निम्न व किंचित वरमध्यमर्गीय (उच्च नव्हे) जीवन जगताना मिळणे ही परमभाग्याची गोष्ट असते. पण तुम्ही जर उच्चमध्यमवर्गीय , उच्चउच्चम.व. आणि ऊ.. .. .. च्च म.व आणि श्रीमंतवर्गीय असाल तर अशा मैत्रिणी सहजी मिळू शकतात. अर्थात तुमच्या खिशातील पैसा मात्र पाण्यासारखा किंवा दारुसारखाच वाहिला पाहिजे.किंवा मग दुसरं म्हणजे तुम्ही मग ' इंदुक ' जमातीतले असला पाहिजे.(ही कोणती जमात म्हणता ? वेगळा दी sss र्घ लेख पाडावा लागेल.पाडू का ? पाडू ?? )

अर्थात दारुपानातील महिलांचा सहभाग हा ' मैत्रिण ' या सदरात (म्हणजे Head)मोडणाऱ्या महिलांसाठीच मर्यादित आहे. आई, बहिण,मुलगी,भाची, पुतणी, काकी,मावशी यांना या सदरात बंदी आहे. त्यातल्या त्यात चालू

प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

शकण्यात नंबर लागू शकतो आधी सख्खी मामेबहिण, मावसमामेबहिण, चुलतमामेबहिण, आतेबहिण, चुलतआतेबहिण इ., मग चुलत बहिण, मग चुलतचुलत, मग मावसमावस बहिण; बहिणी संपल्या की मग वहिन्या ! आधी सख्खी वहिनी,मग चुलतवहिनी ,मामेवहिनी,मामेकाकेवहिनी किंवा मानलेली वहिनी अथवा मित्राची बायको.या अशा स्त्रिया असतात की ज्या आपल्या मैत्रिण होवू शकणाऱ्या असतात.आईबहिण इ. यांच्याशी पुरुषाने मैत्री करण्याची पध्दतीच आपल्यात नाही.निखळ मैत्रभावच जिथे नसतो तिथे मद्यमैत्री असण्याचा तर संबधच नसतो.नाही का ? आँ ?!

पण आई , बहिण ही तिच्या मित्राबरोबर दारु पित असेल तर ते मात्र बहुतेक पुरुषांना चालत नाही. **चालायला पाहिजे.** कारण त्या जरी आपल्या आयाबहिणी असल्या तरी त्यांच्या त्यांच्या (respectively) मित्रांच्या मैत्रिणी असतात. त्यामुळे इतरांना त्यांच्या मैत्रिणीबरोबर दारु पिवू देण्यास , sexciting वाटू देण्यास हरकत नसावी.काय ? बरबर आहे ना ? (मग त्या आपली मातोश्री व बहिणीश्री असली तरी हरकत नसावी.)



## दारु पिणाऱ्या महिलांचा वर्ग

दारु पिणाऱ्या स्त्रिया कोणत्या वर्गातल्या असतात बरे ? (इयत्त्तेत नव्हे , सामाजिक वर्गात ). खरे तर त्यांना कोणताही वर्ग असा नसतो. तरीही इथले जात वास्तव लक्षात घेतले तर एक म्हणजे निम्नजातीय स्त्रिया सहजपणे दारुकाम करताना आढळतील किंवा शिकून फारच शहाणे झालेल्या व स्वातंत्र्याचे वारे प्यायलेल्या अर्थाजर्नन करणाऱ्या किंवा न करता केवळ नवऱ्याच्या जीवावरही काही स्त्रिया दारुकाम करताना आढळतात.निम्नवर्गीय महिलांना दारुकाम करणे सहज असते तर उच्चवर्गीयांना वाटते की त्या त्यांचे पुरुषी जोखड फेकून देवून त्यांचे व्यक्तिस्वातंत्र्यच दारुपानाने आविष्कृत करीत आहेत !

## स्त्रीमुक्तिवादी चळवळीची बदनामी

दारु पिणाऱ्या अशा दुसऱ्या प्रकारच्या स्त्रियांमुळे स्त्रीमुक्तिवादी चळवळीची व त्यात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या स्त्रियांची विनाकारण बदनामी झाली आहे.स्त्रीमुक्तिवादी स्त्रिया दारु पित असल्याच्या समजामुळे त्यातील स्त्रिया बदनाम होतातच पण उगाच विनाकारण काही पुरुषही स्त्रीमुक्तिवादी चळवळीत सहभागी होतात.' आपणही त्याच विचारांचे आहोत ', अशी फुशारकी , बाजीरावीकी मारीत (व त्या स्त्रियांवर लाईन मारीत) चळवळीत राहतात. ' ' " ' भोळ्याभाबड्या स्त्रीमुक्तिवादी स्त्रिया अशा पुरुषांच्या पुरुषतंत्राला क्वचित बळीही पडतात " ,' अशी अफवा आहे, ' अशी चर्चा आहे.ज्या शहाण्या असतात त्या अर्थात बळी पडत नाहीत.असो . ( कारण हा ही एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे.)

## क) दारुकाम व विषयसेवन .

हाही अर्थातच तद्दन ठार पुरुषी मुद्दा आहे. पुरुषांचा एक समज असा करुन दिला गेला आहे (कुणी दिला रे ? )की दारुकामानंतर 'काम ' फार चांगले,दर्जेदार व बराच बराच बराच वेळ होत राहाते ! आता मात्र हद्द झाली !!! असा समज कसा पसरतो कोण जाणे . खरे तर असे काही नसतेच .या भानगडीतील खरे रहस्य किंवा 'नग्नसत्य' म्हणू हवे तर महर्षी व्यास व महर्षी वाल्मिकी यांनी सांगिलते आहेच ,शिवाय चारशे वर्षांपूर्वी शेक्पीअरनेही सांगून टाकले आहे. मॅक्बेथ नाटकात तुलनेने कमी महत्वाच्या एका पात्राच्या, एका Porter च्या तोंडी त्याने एक वाक्य टाकले आहे ते असे " it provokes the desire but takes away the performance ! " आता बोला , राजे !!

संतमंडळी तर कंठशोष होईपर्यंत यातील निरर्थकता सांगून ते गेले देखील ! (त्यातील एकजण तर सदेहच स्वर्गात गेला म्हणा.) शिवाय विश्वकोशातही दारुकामाचा व प्रत्यक्ष कामोपभोगातील क्षमतेचा संबंध नसल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे ( वाचा हो ती नोंद तेवढी ! ) एवढे असूनही लोक ऐकत नाहीत. त्यामुळेच बाई अन्

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

बाटलीचा अनिवार्य , अन्योन्य संबंध जोडला जातोच. त्यामुळे दारुच्या जाहीरातीत बाई असतेच असते , पण तिचाच विस्तार म्हणून कोणत्याही ' पु.प्र.डू.' छाप असलेल्या प्रत्येक वस्तूच्या जाहीरातीत बाई असतेच !

या अन्योन्यसंबंधामुळेच दारुच्या गुत्त्यांमधील नोकरांची जागा आता बायकांनी घेतली आहे. त्याच ' बारबाला ' किंवा मद्यागारबाला .दारीद्र्य, महागाई,उपासमार या कारणांबरोबरच स्त्रियांच्या सेवाचे झालेले बाजारीकरण व वस्तूकीकरण (marketization and commodification) ही सुध्दा या मद्यागारबाला निर्मितीमागील कारणे आहेत. पण बाटली व बाई या सनातन संबंध कोणत्याही धर्मग्रंथाइतका सनातन आहे. पाश्चात्यांनी आपल्या आधीच ही प्रगती सिध्द केलेली आहे.दुदैवाने हा संबंध लक्षात घेताच उपमुख्यमंत्री आबासाहेब पाटील यांनी ' डान्सबारांवर बंदी ' घातली आहे. तर तिकडे श्रीगणेश नाईक दारुची भलावण करीत आहेत आणि श्री. शरद पवार वाईनचे गुणगान करीत आहेत .(सरकारात तर एकमत असावे की नाही ? हे सरकार चालणार कसे ? सांगा बरे ? असे मतभेद उघडकीस आणणे चुकीचे आहेच पण शत्रुपयोगी आहे ! )



## [I ] दारु व सौंदर्यशास्त्र (कला )

दारुचे स्वतःचे एक सौंदर्यशास्त्रही आहे.दारु ही मुळात एक नितांत सुंदर गोष्ट आहे. ती संस्कृतीच्या विकासातील महत्वाचा टप्पा आहे.उगाच तिला भारतीयांनी चौदा रत्नात जागा दिलेली नाही. ती ही चांगली प्राईम लोकेशनला म्हणजे चौथ्या क्रमांकाला दिली आहे.शिवाय तिला लक्ष्मीची बहिण , ती ही ' थोरली ' म्हंटलं आहे ! अशा दारुचे सौंदर्यशास्त्र काय असू शकते ? तर उदाहरणार्थ दारुपानाने कोणता सौंदर्यशास्त्रीय अनुभव येतो ? कसा येतो ? त्याचे स्वरुप काय ?हा सौंदर्यानुभव व्यक्तिगत असतो की सार्वत्रिक असतो ? दारुच्या सौंदर्याचे निकष कोणते ? कुणी ठरविले ? झालचं तर दारुचे सौंदर्यशास्त्र ब्राह्मणी आहे की अब्राह्मणी आहे ? खरे तर ते अब्राह्मणीच असायला हवे ! इत्यादी इत्यादी.पण ते किचकट विषय जावू द्या . आपण जरा प्रॅक्टिकल सौंदर्यशास्त्र पाहू.

चांगली दारु ही चांगल्या बाटलीत दिली व नंतर चांगल्या ग्लासात सर्व्ह झाली तरच चांगली लागते.खरे तर दारुनिर्मिकांची एक डोकेदुखी म्हणजे बाटलीला कोणता आकार द्यावा ? ती कमाल चांगली दिसावी , जास्तीत जास्त घेतली जावी यासाठी ती चांगली, सुंदर दिसावी म्हणून काय करता येईल याचा ते कायम (शुध्दिवर राहून )विचार करीत असतात.ग्लासांमध्ये तर अनेक प्रकार व आकार आहेत .काही आकार तर उन्मादक व कामुकच असतात ! (पाहिलेत काय ? )

पण दारुचा एक दुदैवी संबंधही सौंदर्यशास्त्रातील एका घटकाशी जोडला गेला आहे. तो म्हणजे कलेशी दारुचा संबंध.खरे तर कलेशी दारुचा काहीशी संबंधच नाही .पण कलाकारांनी दारु इतकी बदनाम केली आहे की विचारता सोय नाही.ताण येतो म्हणून दारुकाम करणाऱ्यांच्या यादीत कलाकार अव्वल आहेत. मुख्यतः संगीत , नाटक व सिनेमाक्षेत्रातील कलाकारांनी दारु व कलाक्षेत्र भयानक बदनाम केले आहे. त्यांच्या कितीतरी कुरस (कुरसच ! ) कहाण्या आहेत. अनेक जण तर केवळ अतिरिक्त दारुकामामुळे मेले आहेत पण इतरांमध्ये (म्हणजे मेलेतरांमध्ये ! )एका काडीचीही (एका घोटाचीही ! ) सुधारणा नाही.खू sssss प , खू ---------------------प दारु प्यायल्यामुळे ते त्यांच्या नैसर्गिक मरणापर्यंत दारुचा आनंद घेवू शकत तर नाहीच पण दारुमुळे थेट सरणावरच चढतात.( विरोधी अर्थाने ते मरेपर्यंत दारु पितात लेकाचे ! ) अशा कारणांमुळे पूर्वीच्या नाटकसिनेमात पूर्वीच्या मुलामुलींना पूर्वीचे आईबाप जावू देत नसत." वाया गेलाच " अशी धर्मश्रध्दाच होती.(आजचे आईबाप आजच्या मुलांना जावू देतात. न दिल्यास ' वाया जाईल ' अशी भिती वाटते त्यांना ! )

बरे हे कलाकार स्वतः दारु पितात ते ठिक आहे.पण या बदमाशांनी प्राण्यांनासुध्दा या सवयी लावल्या आहेत.हत्ती, घोडे,कुत्री इत्यादी प्राण्यांना ही दारुची सवय लावली आहे .फार पूर्वी मोहरम किंवा लग्न इत्यादी समारंभात घोडे नाचवत असत.मुळात घोडा या प्राण्याला युध्दात पाहण्याची किंवा शिवाजी, झासी अथवा राम,कृष्ण

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

, सिकंदंर यांच्या सोबत पाहण्याची आपली सवय.घोडा नाचताना पाहणे हा त्याचा व आपलाही अपमान . पण साल्या या नाच्या घोड्याने मस्त नीट नाचावे म्हणून त्यालाही दारु पाजली जाते . आता काय म्हणावे !

## [J) दारुकामाचे तर्कशास्त्र

लोक दारु का पितात ? याची उत्तरे विविध प्रकारे दिली जातात.त्यात दोन प्रकार आहेत एक मानसशास्त्रीय व दुसरा तर्कशास्त्रीय.या दोन्हीत सध्या तरी फरक करण्याचे कारण नाही. केले तरी ते फारच जटील होईल.(आणखी एक लेख ! ) त्या फंदात आता पडायला नको .शिवाय ही तर्क करणे ही जशी तार्किक प्रक्रिया आहे तशीच ती मानसिकही आहे .तर्कशास्त्रात आपल्या म्हणणे सत्य असल्याच्या दाव्या दाखल युक्तिवाद केले जातात.दारु पिण्याच्या दाव्याबाबत अशीच कारणे दिली जातात.त्यातील काही मुख्य कारणे किंवा युक्तिवाद पुढीलप्रमाणे :



***1) आनंद झाला म्हणून :***

युक्तिवाद : मूल झाले, नोकरी लागली, ती कायम झाली , कोर्टाचा निकाल आपल्यासारखा , लग्न जमले / झाले, ),घटस्फोट झाला (हवा असताना), परीक्षेत यश मिळाले , कर्ज मंजूर झाले / मिळाले ,घर बांधले इत्यादी कोणत्याही कारणामुळे आनंद झाला की दारुकाम होते (जास्तच होते

***2) दुःख झाले म्हणून :***

युक्तिवाद : मुख्य म्हणजे प्रेमभंग झाला म्हणून (उदा.देवदास ), विश्वासघात इ.इ.घटस्फोट झाला (नको असताना), भाऊबहिणबंदकी , बेकारी , वैफल्य , कुणाचे तरी मरण ( काही जातीजमातीत तर खांदेकऱ्यांना उतारा म्हणून दारुकाम करुनच द्यावे लागते, अन्यथा पुढच्या खेपेला प्रॉब्लेम होतो ! )

***3) टाईमृप्पास म्हणून***

युक्तिवाद : काहीच काम नाही , घुळीसारखा रिकामटेकडा आहे, बापाचे पैसे उडवावयाचे आहेत किंवा कमी वयात लायकीपेक्षा जास्त पगार मिळतो म्हणूनही असा नशीला टाईमपास केला जातो.

***4) व्यसन लागले म्हणून***
***5) प्रतिष्ठा म्हणून***
***6) पुरुषार्थ म्हणून / स्त्रियार्थ म्हणून सुध्दा***
***7) रिलॅक्सहोण्यासाठी(केलेल्या कामाचा किंवा काम न केलेल्याच्या / न केलेल्याही कामाचा ताण घालविण्यासाठी )***
***8) नवे मित्र मिळाले किंवा मैत्रिण मिळाली म्हणून / बऱ्याच दिवसांनी मित्र भेटला / ली म्हणून***
***9) व्यवसायाची गरज म्हणून("आज जरा चर्चा आहे" किंवा "आज जरा बसायचयं ! ")***
***10)भूक वाढावी म्हणून (एकच घोट.. ..तीस एमएल. ) (अशा महाभागांना ' तर्कतीर्थ ' म्हणण्याची पवित्र परंपरा आहे. )***
***11) मिल्ट्री कँटिनची स्वस्त मिळते म्हणून***

या सगळ्या व इतर काही गोष्टी एक लक्षात येईल की,-

दारुचा सर्व अंगानी ; विशेषतः समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय अंगांनी विचार झाला पाहिजे.ती गांभीर्याने घेण्याची गोष्ट आहे.(मग तुम्ही स्वतः दारु घ्या किंवा घेवू नका.)दारुचे अस्तित्व पुरातन आहे.देवादिकांनाही तिचा मोह पडला तिथे झंगुर माणसाची काय कथा ? चोरी,लांडीलबाडी ,

भ्रष्टाचार,गुन्हेगारीसारखी दारु हे एक दुरित आहे. अन् दुरित हे जगण्यातले नाट्य आहे. म्हणूत तर जगण्यात मजा आहे.

पण आपण सगळी शहाणीसुरती माणसे कोण्या भ्रमात असतो कोण जाणे , एक गोष्ट लक्षात घेत नाही. ती अशी की मद्यपानाची संहिता पाळत नसल्याने मद्य बदनाम होते.तिचा सांस्कृतिक व धार्मिक दर्जा घसरतो.तिचे व्यसन लागते.त्यामुळे पुढची पायरी येते ती मद्यासक्तिची.तिचे थोडक्यात स्वरुप पाहिल्यास या आचारसंहितेची गरज लक्षात येईल

## K] मद्यासक्तिचे स्वरुप व त्यावरील उपाययोजना

मद्यासक्तिला मद्याइतकीच प्राचीन परंपरा आहे. मद्यसेवनाचे अतिरेक प्राचीन काळापासून नमूद केलेले आहेत.त्याविरुध्दच्या उपदेशाची नोंद महर्षी वाल्मिकी (अंदाजे 6500 वर्षे पकडू या की ! )लंकेतील *पानभूमीचे* वर्णन करताना करतात .मद्यासक्तिमुळे धर्म, अर्थ व काम भ्रष्ट होतात, असे ते म्हणतात.शिवाय तीन हजार वर्षांपूर्वीच्या ईजिप्ती वाङमयातही मद्यासक्तिविरोधात उपदेश आढळतो.याचा अर्थ तत्कालिन समाजात दारुपानाचा अतिरेक झाला असणार ! पण विसाव्या शतकातील व एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरील जागतिकीकरणाच्या काळात मद्यप्राशनाचा जागतिक अतिरेक मात्र मानवजातीच्या इतिहासातच अद्भूत व अपूर्व ठरलेला आहे. त्यामुळे आज मद्यासक्ति ही एक अतिअतिअतिबिकट सामाजिक - आर्थिक , नैतिक आणि वैद्यकिय समस्या होवून बसली आहे.मद्यासक्ति हा व्यसनाधीनतेचा प्रकार असून तो व्यक्तिमत्वविकाराच्या सदरात मोडतो.

**एखादी व्यक्ती मद्यासक्त झाली आहे, हे कसे ओळखावे ? तर त्याची काही लक्षणे अशी :**

1. पूर्वी तुम्ही कधीतरी विशेषप्रसंगी पित होता...
   *आजकाल सहज म्हणून आणि तीही अधिकाधिक पिता !*
2. पूर्वी तुम्ही मित्रांबरोबर पित होता . . .
   *आजकाल तुम्हीच पिण्यासाठी मित्र शोधित असता किंवा एकटेसुध्दा पिता !*
3. पूर्वी तुम्ही शनिवारीरविवारी पित होता...
   *आजकाल इतर दिवशीही पिता !*
4. पूर्वी तुम्ही फक्त रात्रीच पित होता.. .
   *आजकाल तुम्ही लवकर संध्याकाळी अन् अलिकडे तर सुटीच्या दिवशी दुपारी आणि सकाळी सुध्दा पिता !*
5. पूर्वी तुम्ही एकदोन पेगवर थांबत होता.. .
   *आजकाल तुम्ही दोन पेगच्या पुढे , क्वार्टरच्या पुढे जात आहात !*
6. पूर्वी तुम्ही चांगली , दर्जेदार प्यायची म्हणून महागडी दारु पित होता. . .
   *आजकाल स्वस्त पडते म्हणून कोणतीही हलकी दारु पिता !*
7. पूर्वी तुम्ही फक्त पार्टीतच पित होता. . .
   *आजकाल तुम्ही पार्टीला जाण्यापूर्वी दोन पेग मारुन जाता !*
8. पूर्वी दारु पिवूनही तुमच्या वागणूकीत फरक पडत नसायचा (बॅलन्स्ड असायचा !!)
   *आजकाल प्यायल्यानंतर वागणूकीत लगेच फरक पडतो !*
   अ) मुळात बोलके असताना प्यायल्यानंतर तुम्ही शांत होता .
   ब) मुळात शांत असताना प्यायल्यानंतर तुम्ही बडबडे बनता.
   क) मुळात बडबडे असताना प्यायल्यांनतर तुम्ही चिडके होता.
   ड) मुळात चिडके असताना प्यायल्यानतर तुम्ही हिंसक होता . . .

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



ई) .. .. आणि प्यायल्यानंतर तुमची हिंसा प्यायल्यांनतर कोणत्याही पातळीवर जाते.प्रसंगी तुम्ही हत्या सुध्दा करता !

9.पूर्वी तुम्ही दारु पिण्याआधी कामधंद्याचा विचार करीत असायचा . . .
*आजकाल तुम्ही फक्त आणि फक्त पिण्याचाच विचार करता !*

*10. .. .. .. आजकाल तुम्ही दारुशिवाय जगूच शकत नाही !*

## व्यक्ती मद्यासक्त का होते ? त्याची कारणे अशी :

A} मद्यासक्तिच्या आहारी जाण्याच्या कारणमीमांसेचे मुख्य सिध्दान्त असे :

1. मनोविश्लेषण सिध्दान्त : फ्रॉईड , ॲडलर मुख्यतः
2. जननिक सिध्दान्त : आनुवंशिक मौखिकता + चयापचयातील वैगुण्यामुळे येणारी व्यसनाधीनता.
3. समाजशास्त्रीय सिध्दान्तः आर. एफ. बेल्सचा सामाजिक तणावाचा.
4. अध्ययन सिध्दान्त : चिंता व मनोविग्रह दूर होत असल्याच्या समजामुळे होत राहणारे मद्यपान.
5. व्यक्तीमत्व विकारी सिध्दान्त : नियमित मद्यपान ही जणू *'संथ आत्महत्या* असे सांगणारा सिध्दान्त
6. शरीरशास्त्रीय सिध्दान्त : पिणे ही शरीराची गरज बनणे.त्याशिवाय साध्या हालचालीही अशक्य होणे . विशेषतः हरहुन्नरी कलावंत याचे बळी असतात .

B} मद्यासक्तिचे दोन मुख्य प्रकार व लक्षणे :

अ) ई.एम. जेनेलिकचे 5 प्रकार :

1. आल्फा मद्यपी : अतिरेकी मद्यपान करणारे पण त्यावर अवलंबून न राहणारे .
2. बीटा मद्यपी : अतिरेकी मद्यपान केल्यामुळे शारीरिक रोग जडलेले पण ते कळूनही पिणारे.
3. गॅमा मद्यपी : मद्यासक्ति जडल्याने व ती सुटत नसल्याने सतत वाढणारे मद्यपान.
4. डेल्टा मद्यपी : मद्यासक्ति जडूनही पिण्याच्या प्रमाणावर ताबा ठेवणारे .
5. एप्सिलॉन मद्यपी : कधीतरी पण जास्तच मोठ्या प्रमाणावर पिणारे .

ब) चिकित्सकीय प्रकार :

1. मद्यजनक गैरशुध्दि (ब्लॅकआउट ): अतिरेकी पिण्यामुळे समाजविघातक वर्तन घडते पण त्याची स्मृति राहात नाही.
2. विकृत नशा ( पॅथॉलौजकल इंटॉक्सिकेशन ):जाणिव नष्ट होवून भ्रमिष्टता व स्मृतिलोप होणे
3. कंपनमय मुग्धभ्रांती ( डिलीरियम ट्रिमेन्स ): निद्रानाश, दिशाभूल, दृष्टिभ्रम - प्राणी छोटे दिसणे
4. मद्यासक्तिजन्यता :निर्वस्तुभ्रम : हे मद्यपानामुळे अंर्तमुखी (स्कीझॉईड )व्यक्तिस होते - परिणामी ती भावनाविवशतेला बळी पडते.
5. संभ्रमविकृती : संशयी व्यक्तिस ; पतीस पत्नीबद्दल संशय .
6. कोरसॅको लक्षणसमूह ( कॉन्फॅब्यूलेशन ):भूतकाल विसरुन कल्पनाविश्वात राहणे.
7. बुध्दिभ्रंश ( डिमेर्शिया ): स्मृति हरवून गचाळ, निष्क्रिय , अस्वच्छ,गलिच्छ व परावलंबित होणे.

**दारुकामाची उपयोजित नीती (Appied Ethics for Alcohol consumption )**

प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे

**"दारु कशी पितात रे भाऊ ?" अर्थात मद्यपानाची आचारसंहिता**

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

या जगात दुरित का आहे ? ही एक तात्विक (Philosophical Problem ) समस्या आहे.भलेभले तत्त्वज्ञ त्याचे उत्तर देण्यात थकून गेले (अक्षरश !).दैवी दुरित, नैसर्गिक दुरित आणि मानवनिर्मित दुरित असे दुरिताचे प्रकार आहेत. नैसर्गिक व दैवी दुरिते आपल्या हाताबाहेरची आहेत.मानवी दुरित हा मात्र अगदी किमान पातळीवर आणला जावू शकतो.पण नष्ट करता येणारा नसतो.दुरिते समाजात का आहेत ? हा प्रश्नच निरर्थक आहे.ज्यांची उत्तरे कधी द्यावयाची नसतात, त्या प्रश्नांमधील तो एक प्रश्न आहे.ते अव्याकृत आहे.त्याचे अस्तित्व मान्य करणे व त्याची समाजात असण्याची आणि समाजावर प्रभाव टाकण्याची पातळी कमी करणे एवढेच आपल्या हाती असते .फार तर एवढेच म्हणता येईल की 'दुरिताचे समाजाचे असणे' ही मानवी जीवनातील एक लीला आहे, ते जगण्यातील नाट्य आहे.हे विश्वच निर्माण झाले नसते तर हा सगळ प्रपंचच नसता. म्हणून तर वेदान्त या जगाच्या अस्तित्वाला ***ईश्वराची लीला*** मानते . जगच जर अस्तित्वात नसते किंवा भासले नसते तर जगण्यातली मजाच निघून गेली असती. अहो, आत्मचरित्र लिहिण्यातील गंमतच पळून गेली असती.(हा लेख लिहीण्याची, तो तुम्ही वाचण्याचीही गरजच नसती.) लोक वाईट वागतात म्हणून तर चांगल्या लोकांचे चांगलेच फावलेले असते .त्यामुळे हे ***चांगले लोक हे नैतिक नक्षलवादी (moral naxlist ) बनतात*** .वाईट वागले जाण्याचे मानसशास्त्र व त्यातील नाट्य लक्षात न घेता हे नैतिक नक्षलवादी समाजालाच नीतीच्या टोकावर धारेला धरतात .( निदान पहिल्या धारेची टाकायची तरी ! काही खरे नक्षलवादी टाकतात बरं ! पहिल्या धारेची !! )



जगात नैतिक दुरिते आहेत.म्हणून त्यावर उपाययोजना म्हणून शिक्षेची तरतूद आहे,शिक्षा देणारा कायदा आहे, त्यासाठी कायदादान पध्दती , अमलबजावणी यंत्रणा तयार करावी लागते . शिक्षेचे सिध्दान्त बनवावे लागतात. त्यांचा सातत्याने पुनर्विचार करावा लागतो .असे मुख्य तीन सिध्दान्त आहेत (सांगू का ? नवा लेख पाडावा लागेल ! ) तेंव्हा हे लक्षात ठेवले पाहिजे की " दारु पिण्यात काहीही चूक ( illogical ), अनैतिक नाही (morally wrong). तर ' **जास्त व बेकायदा, विनापरवाना** दारु पिणे हे अनैतिक आहे.प्रशिक्षणाशिवाय पिणे चुकीचे आहे.योग्य प्रमाणात , चांगल्या दर्जाची , चांगल्या कंपनीत, स्वःताच्या पैशाने पिणे , हे बरोबर व नैतिक (logically right and morally good ) आहे.

चुकीचे आहे ते अतिरिक्त व रोजचे दारुकाम . ते व्यक्तिगत व सामाजिक नुकसान करते. ते नुकसान स्पष्ट करण्यासाठी त्या बिचाऱ्या गडकऱ्यांना एक आख्खे ' एकच प्याला ' नावाचे नाटकच लिहावे लागले.(सर्व शाखांच्या अभ्यासक्रमात हे नाटक कंपलसरी लावले पाहिजे.) आपण आता कुणी ' गडकरी ' आहोत काय ? असलोच तर ' तळीराम ' असू . तेंव्हा आपल्या दिवट्यांनी व मशालींनी दारुपायी वाया जावू नये असे वाटत असेल तर सर्व पालकांनी व नवशिक्या दारुबाजांनी प्रशिक्षणाचा योग्य दिशेने विचार केला पाहिजे .त्यासाठीच दारुकडे आपण सगळ्यांनीच आता जास्त निकोप व निर्दोष दृष्टिने पाहण्याची कला आत्मसात केली पाहिजे.

तुम्ही जगाकडे कसे पाहता यावर तुमची जीवनदृष्टि अवलंबून असते.दारु हा जगाचा रचनात्मक घटक व नियामक घटक (constitutive and regulative factor)आहे.त्यामुळे तुम्ही दारुकडे कसे पाहता याचा अर्थ तुम्ही जगाकडे कसे पाहता ? त्यातून तुमचा world view दिसतो. तुम्ही जगावर प्रेम करता की नाही ते मरु द्या हो ,( या जगात ज्यांच्या बरोबर जगण्याची - मरण्याची तुम्ही देवाधर्मासमोर शपथ घेतलेली असते ती तुमची सहधर्मचारिणी असते , तिच्यावरच्या प्रेमाचा भौतिक साक्षीदार म्हणून तुमच्या अस्तित्वातूनच निर्माण झालेली ; तुमची हुबेहुब प्रतिमा असणारी तुमची संततीही असते . तुमच्या अस्तित्वाचचं सातत्य !!त्यांच्यावरही तुमचं प्रेम आहे की नाही , हाही मु-1 नाही. )

आता निदान, "तुम्ही तुमच्यावर तरी प्रेम करता की नाही हे तुमच्या" जगाविषयीच्या आकलनातून आणि धारणांमधून कळत. हाच नियम दारुबाबतचा . दारुबाबत तुमचं आकलन असे सांगेल की *"तुम्ही नियमित व जास्त दारु पित असाल तर स्वतःवर प्रेमच करीत नाही आहात, योग्य प्रमाणात पित असाल तर कमी प्रेम करता आहात, पितच नसाल तर खरेच खरे प्रेम करता आहात!"*

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



आणि जर तुम्ही तुमच्यावरच प्रेम करीत नसाल तर तुम्ही तुमच्याच अस्तित्वाचा विस्तार असलेल्या कुटुंबावर कसे प्रेम कराल ?

तेंव्हा शिकलं पाहिजे ते स्वतःवर प्रेम करायला.जगला वाचला तर इतरांवर प्रेम करा.' आधी मी मग माझं कुटुंब !' आणि मग "मी म्हणजेच माझं कुटूंब ! " असाच दृष्टिकोन तुम्ही बाळगला पाहिजे. स्वतःवर प्रेम करायला शिकलं पाहिजे. ज्याल स्वतःवर प्रेम करायची क्षमता नाही, तो इतरांवर देशावर देशबांधवांवर काय मसणप्रेम करणार ? तुम्हाला स्वतःवर प्रेम करणारा हा अहंकेंद्रवाद मान्य आहे का ? (तत्त्वज्ञानात एक असा अहंकेंद्रवादी विचार आहे, बर ते जावू द्या) तर आहे का असा तुमचा दृष्टिकोन ?

बरं , तुम्ही पितही नसाल पण तुमचं इतरांवर प्रेम असेल तर त्यांच्या पिण्याकडे तुम्ही शास्त्रीय व सहानूभूतिच्या दृष्टिनेच पाहाणे आवश्यक आहे. कारण, इतरांवर प्रेम करणं म्हणजे पुन्हा स्वतःवरच प्रेम करणं.कारणं ते इतरजण ही माझ्याच अस्तित्वाचा विस्तार असतात. जसा मी कुणाच्या तरी अस्तित्वाचा विस्तार आहे . तस्सेच इतरजणही माझ्याचा अस्तित्वाचे विस्तार आहेत. त्यांच्यावर प्रेम असेल तरच मी समजून घेईन ; अन्यथा नाही. एवढेच.ज्या जगात तुम्हाला राहावयाचे आहे, त्याची रचना कशी करावयाची हे तुम्हीच ठरवू शकता.मग तुम्ही कार्यकर्ते असा की विश्लेषक असा की राज्यकर्ते असा.आपली प्रजा कशी राहावी, हे तुम्हीच ठरवू शकता.( पण आपण सत्तेत राहावे की बाहेर राहावे हे ही त्याचवेळी प्रजासुद्‌धा ठरवू शकते, याचे भानही राज्यकर्त्यांनी बाळगणे शहाणपणाचे असते.नाही का ? )

## मद्यउद्योग - वाघावर स्वार होणे

या मद्यनीतीचे मुख्य सूत्र ' मद्यपानात संयम असावाच ' हा असला पाहिजे.' मद्यबंदी ' हा असता कामा नये.ते अशक्यच आहे.मग वास्तव स्वीकारुन त्यात कमीत कमी काय करता येईल ते करावे. ते जे काही करावयाचे ते म्हणजे ' मद्यपान करणे चूक किंवा अनैतिक नव्हे तर **'गरजेपेक्षा जास्त मद्यपान करणे अनैतिक आहे** ' हेच सूत्र मांडणे असावे. (गरज ओलांडणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देणे ) मद्यविषयक नीती ठरविणारी नीतीसमिती स्थापन करता येईलच. ही मद्यनीतीसमिती स्थापन करणे ही आजच्या व उद्याच्या काळाची गरज आहे.कारण मद्यउद्योग जगात , भारतात पाय रोवून पक्का झाला आहे ? कसा आहे तो ? कोण आहेत हे मद्यसम्राट ? ते स्वतंत्रपणे मद्यसम्राट आहेत की शिक्षणसम्राटांसारखेच सत्ताधिकाऱ्यांशी अद्वैत नातेसंबध सांगणारे आहेत ?

आजच्या भारतीय मद्यउद्योगाचे स्वरुप काय ? मुळात तो गैरधंदा. समाजघातकीपणाचा.सगळ्यांचेच स्वास्थ्य नष्ट करणारा, कायदा व सुव्यवस्था यांचे बेकायदा व कुव्यवस्थेत रुपांतर करणारा किमयागारच जणू ! खरे तर कोणताही गैरधंदा हा वाघावर स्वार होण्यासारखा असतो. त्यामुळे मद्यउद्योगातील कोणताही सक्रीय , अक्रिय वा निष्क्रीय - सहभाग हा वाघावर स्वार होण्यासारखाच आहे.म्हणून भारतातल्या पवित्र वैदिक परंपरेतील विद्यमान आणि अत्याधुनिक अखिल भारतीय मद्यचक्रवर्ती विजय मल्ल्यासाहेब ( च्यायला ! याचं नाव शेट्टी कसं नाही बरं ? ) हे एका जाहीर मुलाखातीत म्हणतात ***" मी वाघावर स्वार झालो आहे.खाली उतरलो तर तो वाघच मला खाऊन टाकेल ! "***

वाघावार स्वार होण्यात शौर्य नक्कीच आहे.पण ते येरागबाळ्याचे काम नोहे.ते एखाद्या चांगदेवाला जमू शकते.पण त्यालाही खाली उतरण्यासाठी ; ते सुध्दा खाली उतरल्यानंतर थेट त्या वाघाच्या पोटात न जाता सामान्य जीवन जगण्याची संधी मिळण्यासाठी <u>ज्ञानेश्वरासारखा गुरु</u> भेटावा लागतो !! म्हणजे चांगदेव होणं ही सुध्दा एक पात्रता आहे.एखादा वेडा वाघावर स्वार झाला की त्याला ज्ञानेश्वर कसा भेटेल ? हा वेडा उतरला खाली की काय होईल ?

प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे

**"दारु कशी पितात रे भाऊ ?" अर्थात मद्यपानाची आचारसंहिता**

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052

महाराष्ट्र शासन , उत्पादनशुल्क मंत्री श्रीगणेश नाईक, त्यांचे सचिव किंवा सगळा समाजच आज या मद्यरुपी महावाघावर स्वार झाला आहे. खाली उतरला की गेलाच वाघाच्या पोटात ! (वाघाच्या प्राईम लोकेशनला ! ).त्यांना कुठे हा गुरु भेटणार ? (दाभोळकर,अण्णा हजारे अन् अवचट हे काय गुरु आहेत काय ? ही मंडळी गुरुबाळं सुध्दा नाहीत !! ) अन् भेटलाच एखादा गुरु तर या परम शिष्यगणांनी मान्य तर केला पाहिजे ? ते करणारच नाहीत .

**मग ?**

मग वाघावरुन उतरुन मरायचे नसेल तर निदान त्या वाघाला नियंत्रणात तरी आणता येईल की !



**त्यासाठीच हवे मद्यपान संयमाचे नीतीशास्त्र (Ethics ) व त्याच्या संयमनाचे रितीशास्त्र (Modality ).**

मद्यसमस्येकडे पाहण्याचे दोन ठळक मुद्दे माझ्या मते असे :

(1)सरकारला महसूल देणारा तो एक रोखमार्ग आहे पण त्याचवेळी त्या उद्योगाला समाजघातकीपणाची तीव्र झालर ही आहे.

त्यामुळे तिची नैतिक पातळी कोणती ?

(2)मद्यउद्योगाची थेट अनैतिकता म्हणजे मद्यपि व्यक्तीच्या घरखर्चावर व आरोग्यावर होत असलेले आक्रमण.मग मद्यपिचा

आर्थिक स्तर काहीही असो.या आक्रमणामुळे उत्पन्नावर सगळ्या कुटंबाचा हक्क असूनही त्या कुटंबाचे विविध प्रकारचे

नुकसान होते .पर्यायाने समाजाचे नुकसान होते.

आजच्या जीवनशैलीत व अर्थव्यवस्थेत मद्य हा अनिवार्य घटक बनलेला आहे. मद्यपान ही निर्विवादपणे चंगळवादी कृती आहे. माणसाकडे जगण्यासाठी सोडाच पण तगण्यासाठीही पैसे नसले तरी तो मद्यपानाकडे वळू शकतो. म्हणून तर (अगदी कर्म -) दरिद्री मजुर व आदिवासींपासून ते अतिगर्भश्रीमंतापर्यंत सर्वांना मद्य प्रिय असते. क्रेडिट कार्ड ही तर चक्क पैसे नसताना मद्यासह सर्व प्रकारची चंगळ करण्याची मोठी सोय आहे !

चंगळ हा वर्तनप्रकार शुध्द ग्राहकवादाबरोबरच मजावादी ही (आणि काही प्रमाणात सुटकावादी,कॅथार्सिसवादीच ! ) असतो.मजा करण्याची गरज निर्माण करणे , हा खरा ग्राहकवाद म्हणता येईल.तेथून तगणे व जगणे एकत्रित सुरु होते.मद्य हा या जीवनाचा भाग बनला आहे.याचा अर्थच असा की प्राचीन काळातील पवित्र वैदिक परंपरेपासून ते आजच्या अतिआधुनिक जागतिकीकरणवादी अर्थव्यवस्थेत मद्यपान समाजपुरुषाच्या व व्यक्तीपुरुषाच्या जीवनात व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान पटकावून बसले आहे.(अगदी पोटात ! पोट म्हणजे प्राईम लोकेशन- हार्ट ऑव्ह द बॉडी ! ) त्यामुळेच केंद्र व विविध राज्य सरकारांनी मद्यविषयक कायदे तयार केले .महाराष्ट्र शासनानेही असा कायदा केला.आणि चक्क व्यक्तीला ' आरोग्य रक्षण करुन तिला सुस्थितीत ' ठेवण्यास आवश्यक , या सदराखाली मद्यपानाची परवानगी दिली आहे.

आज बहुतेक शहरात म. गांधी, प.नेहरु.डॉ.आंबडेकर इत्यादींना साक्षी ठेवून (म्हणजेच त्यांच्या पुतळ्यांना साक्षीदार ठेवून ! या कुणाच्या तरी पुतळ्याच्या पुढेमागे , नजीकच ते ऑफिस असते.) हे परवाने अगदी माफक दरात (स्मॉल पेगच्या दरात) दिले जातात. याचा अर्थ मद्यपान शासनाला व जनतेलाच मान्य आहे.म्हणून तर मद्यागारांना परवानगी आहेच.

हे मुद्दे मान्य करुन मद्यउद्योगाच्या नैतिककडे पाहण्याचा 'आजच्या' भाषेतील दृष्टिकोन मांडता येईल तो असा : ज्याला आवड आहे त्या व्यक्तिने ' मद्यपान करावे की नाही ', ही समस्या नाही तर त्या माणसाने 'अतिरिक्त मद्यपान करावे की नाही ' , ही समस्या आहे.म्हणजेच 'मद्यपान करणे अनैतिक नाही' तर 'मद्यपि व्यक्तीने प्रथम स्वतः ,

प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे
**"दारु कशी पितात रे भाऊ ?" अर्थात मद्यपानाची आचारसंहिता**
श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



आपले कुटुंब व समाज यांच्या विविध प्रकारच्या आरोग्याचा अंत करण्याइतपत मद्यपान करणे, ही कृती अनैतिक आहे !! हाच मद्यपानासंबंधीचा मूलभूत नैतिक प्रश्न.

अशा नीतीशास्त्राची खरीच गरज आहे का ?

तर नुसती गरज नाही तर ती आज अनिवार्यच ठरली आहे .जसे अनिवार कामभावनेला नियंत्रणात आणण्यासाठी जगातील सर्व संस्कृतींनी लग्न नावाची टूम काढली . ती यशस्वी ठरली .(तरीही निर्लज्जपणे वेश्याव्यवसायही फोफावलाच ! काही देशांनी तर तो कुटूंबाचा अधिकृत व्यवसाय बनविला आहे )हिंदु परिभाषेत बोलावयाचे तर, काम पुरुषार्थाला धर्मपुरुषार्थाचा आधार देण्यात आला . म्हणजेच 'कामभावनेचे नीतीशास्त्र ' (Morality and Modality of Sex ) हवे , म्हणून विवाहबंधनाला धार्मिक व सांस्कृतिक दर्जा देण्यात आला तसा मद्यालाही देणे अनिवार्य आहे.(अर्थात विवाहसंस्था आज कितपत नैतिक उरली आहे, हा ही माझ्याच एका नव्या लेखाचा विषय होईल म्हणा ! काय ? ) मुक्तांगण केन्द्रे ,विपश्यना केंद्रे बंद पडणे हा आदर्श ठरेल खरा .पण नीतीशास्त्राचा सारा डोलारा अतार्किक दुरितप्रधान वर्तनव्यवहारावरांवरच असतो.दारु हे सामाजिक दुरित आहे, तो एक आजार आहे.पण जिथे ईश्वरच गाढवासारखा अतार्किक वागतो तिथे मानव कसा शहाण्यासारखा वागेल ? ( गदर्भराज ! गदर्भसम्राट !! गदर्भचक्रवर्ती !!! असे म्हणू यात का ईश्वराला ? कारण 'गाढव' हा थेट प्राकृत शब्द त्याला उद्देशून वापरल्याबद्दल त्याच्या प्रेमळ , करुणामय भक्तांना फार राग येईल ! रागाच्या भरात ते भक्तीऐवजी दारुच प्यायले तर ? शिवाय माणसालाच काय पण देवाला गाढव म्हणणे , हे निखालस चुकीचे आहे.कारण गाढव हा खरा निर्विकार संन्यस्त प्राणी आहे .पाहा संदर्भ :रस्त्यावरचा कोणताही गाढव ! )

मुकाटपणे एकोहम् पडून राहण्यापेक्षा ईश्वराने ( विनाकारण गाढव व माणसासहचे ) हे जग निर्माण केले आणि असत्सतचे युध्द सुरु झाले ( हो हो ! युध्दच ! युध्दच !! द्वंद्व नव्हे.द्वंद्वात विकास दडलेला असतो, तर युध्दात हिंसा व नष्ट होणेच अटळ असते ) चांगल्यावाईटाचे युध्द आहे म्हणून तर ' चांगले ' चालले आहे नाहीतर सगळे वाईट नसते चालले तरी ' अ-चांगले ' चालले असते. आणि ते ' अ-चांगले ' चालणे हे काही खुद्द ईश्वर व त्याच्या भीषण कट्टर, कडव्या भक्तांसह आपल्याही चालले नसते.

मद्याची व मद्यविषयक आचारसंहितेची अनिवार्यता आहेच आहे .निदान महाराष्ट्रदेशी तरी .याचे कारण मद्यनिर्मिती व प्रशिक्षणात फार मोठी (great potential ची )बाजारपेठ दिसल्याने किंवा शुध्द शैक्षणिक हेतूने (किंवा शुध्द आर्थिक हितसंबंधामुळे म्हणा ) महाराष्ट्रातील सर्वच शैक्षणिक कामांमध्ये अग्रेसर असणाऱ्या विद्यापीठांनी Wine Technology चा चक्क अभ्यासक्रमच तयार केला आहे.व्हिस्की,रम,व्होडका,कॉकटेल,बियर इत्यादींमधील उग्रता व अपायकारकता टाळून लोकरंजनासाठी वाईन चांगली व स्वस्त असल्याचा दावा करुन हे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत.

नासिक, विदर्भ, मराठवाडा, दिल्ली, हरियाणा इत्यादी साऱ्या देशातच वायनऱ्यांचे पिक फोफावले आहे, माजले आहे. अनेक शिक्षण संस्थांनी तातडीने हा अभ्यासक्रम राबविण्यास सुरुवातही केली आहे .त्यासाठी मानव संसाधन मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठे, राज्य शासन गुडघ्यालाच काय पार घोट्याला बांशिग बांधून आहे. आणि आपले शासन म्हणजे ; श्री.शरदराव ,श्रीगणेशराव व श्री. विलासराव हेच तर शासन आहेत. श्री. शरदरावांची "दारुपेक्षा वाईन कधीही चांगली " ही घोषणाही नेमकी याचवेळी यावी , हा काय प्रचंड विलक्षण योगायोग आहे पाहा !

दारुला शासकीय परवानगी , किराणा दुकानात माईल्ड का होईना पण बियरविक्रीची परवानगी , वाईन ही दारुच नसल्याचा शोध , वाईनरीज्चे प्रस्ताव , वाईन तंत्रज्ञानाचे अभ्यासक्रम हे सगळेच कशाचे लक्षण आहे ? शहाण्यासुरत्या लोकांनी तरी किमान प्रमाणात या समस्येचा विचार वस्तुनिष्ठपणे , आदरभावनेने , अहिंसावृत्तीने व प्रेमपूर्वकच केला पाहिजे.जे अटळ आहे त्यावर नीरक्षीरविवेकबुध्दिनेच वर्तनव्यवहार निश्चित केला पाहिजे .जीवनाच्या या अंगाचा स्वीकार करुन त्याची आचारसंहिता ठरविलीच पाहिज़े.

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



अपूर्ण.
इति.

**चौकट क्रमांक 1.**

तीन सिंहाचे चिन्ह
महाराष्ट्र शासन
परवाना

महाराष्ट्र राज्यात विदेशी दारु व देशी दारु विकत घेण्याकरीता,बाळगण्याकरीता,वाहतूक करण्याकरीता , वैयक्तिक सेवनाकारिता व वापराकरीता No . ABC .. .. XYZ नमुना एफएलएक्स - सी (नियम 70 डी पहा )श्री./ श्रीमती / कुमारी ____________18 + राहणार _______ यांना मुंबई दारुबंदी कायदा 1949 व त्याखालील नियम, विनियम व आदेश यांच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्यात विदेशी दारु व देशी दारु विकत घेण्याकरीता,बाळगण्याकरीता,वाहतूक करण्याकरीता , वैयक्तिक सेवनाकारिता व वापररासाठी हा परवाना र. 25 .75 फी वसूल करुन 01 वर्षाकरिता
दि . 1 / 1 / 01 ते 31 / 12 / 01 पर्यंतच्या कालावधी करीता देण्यात येत आहे .

ठिकाण ..आ प ले .. . दिनांक 4 / 2 / 0

अधिकाऱ्याची सही परवाना धारकाची नमुना सही किंचा अंगठ्याची निशाणी
(पूढील कालावधीसाठी परवाना घेण्यासाठी परवाना देण्याऱ्या अधिकाऱ्यांना सादर करण्यासाठी )

**माझ्या प्रकृतीच्या संरक्षणासाठी आणि तिला सुस्थितीत ठेवण्यासाठी मला विदेशी दारु आणि देशी दारुची गरज आहे .असे मी जाहीर करतो / करते .**

ठिकाण : ज व ळ चे .. . . दिनांक 08 / 04 / 00

परवानाधारकाची नुमना सही किंवा अंगठ्याची निशाणी

*( वि. सू . परवान्यावर किती दारु पिण्याची परवानगी हवी आहे, त्याचा शिक्का मिळू शकतो. उदाहरणार्थ एक युनिट = एक क्वार्टर . किती युनिट हवे सांगता येते - लेखकाची माहिती )*

**चौकट क्रमांक 2**

दारु ही फारच वाईट गोष्ट आहे .
जगातून वाईट गोष्टी नष्ट झाल्याच पाहिजेत.
या लोकहो, आपण सगळे जण मिळून ही दारु नष्ट करु.
काही बाटल्या तुम्ही प्या ,उरलेल्या मी पितो.

**चौकट क्र 3**

दोन जीवलग दारुबाज मित्र होते. रोज संध्याकाळी प्यायल्याशिवाय त्यांना कधीही चैन पडत नसे. दोघेही एका विशिष्ट

बारमध्ये विशिष्ट टेबलावर विशिष्ट प्रकारची दारु पित असत.आणि रोज केवळ एकच बाटली ( जी काही हाफ,खंबा इ.इ. असेल ती ! ) पित असत. अन् साहजिकच दोघांचेही दोन ग्लास असत.

अशी अनेक वर्षे गेली. त्यांना तसेच पाहण्याची अनेकांची व अड्डेवाल्याचीही सवय होती.

काही काळाने त्यातला एकजणच नित्यनियमाने बार मध्ये येवू लागला.पिवू लागला.

पण एकटा असूनही त्याच्यासमोर दोन ग्लास दिसू लागले.... ! कधी तो त्याच्यासमोरच्या ग्लासातील घोट घेई तर कधी स्वतःसमोरच्या ग्लासातील घोट घेई .
लोक आता मात्र चकित झाले . हे क्काय ? एकटा असूनही दोन ग्लास ? एकाच ग्लासात पिण्यात क्काय बुवा अडचण .. .. ? आणि दुसरा गेला तरी कुठे ? अशी मोठी शंका लोकांना येवू लागली.
अखेरिस न रहावून एकाने विचारलेच .
" हे , तुम्ही एकटेच असूनही दोन ग्लासातून काय पित आहात? अन तुमचा तो मित्र कुठाय ? "

त्यावर तो म्हणाला ," माझा जो जीवलग मित्र होता ना , तो आज माझ्याबरोबर नाही. तो दुदैवाने वारला . पण तो नाही , हे मी सहनच करु शकत नाही. तो आजही माझ्याबरोबर आहे, असेच मी समजतो. तरच मला ही दारु गोड लागते. तो माझ्याबरोबरच , जवळ बसला आहे, असे समजून मी त्याच्या वाटचाही घोट घेतो ! "

विचारणारा अचंबित झाला. अशी मैत्री लोकांनी कुठे पाहीली नसल्याने ते थक्क झाले. त्यांना ते विचारही पटले.
लोक त्यांच्या मैत्रीचे गुणगाणं गावू लागले. इतर मित्रांना त्याचा आदर्श घ्यावासा वाटू लागला.(मित्र न मरताच )

पण काही दिवसांनी मात्र त्याच्यासमोर एकच ग्लास दिसू लागला.
आता मात्र लोक बुचकळ्यात पडले. आता काय झाले असावे बरं?
एकाने विचारले " काय झाले ? आता तुम्ही एकच ग्लास घेता ? "
तो उत्तरला " दारु फार वाईट . माझा मित्र दारुमुळे स्वर्गवासी झाला.त्यामुळे मी दारु सोडलीय !"
" तुम्ही सोडलीय ? " विचारणारा किंचाळलाच, "आणि तुम्ही पिताय ती दारु ? "
" ती !? ती मी माझ्या मित्राची दारू पितोय ! " तो उत्तरला.

**एक अफलातून sms पाहा , तो तयार करणारा मद्यप्रेमी असणारच पण बुधिमानही असणार !**

Hi Dear,
Problems may come and go in life for u

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



but u must take it as a *' Royal Challenge '*
Otherwise people will call u *' Old Monk '* and
stick a *' Black Lable '* on u.
But u must fight like *' Nepooleon '*
live like *' Bagpiper '*
walk like *' Johny Walker '*
work till *'8pm'*
Think like*' Director Special '* only
Then your life will be like a *' Imperail Blue'*
If u do the above things
even your *' Signature '* will be of a very good value !

## अल्कोहोल चालिसा

गुरुर रमाः गुरुर व्हिस्की गुरुर व्होदका मल्ल्याश्वरा
गुरुर स्कॉचात परब्रण्डी
तस्मै श्री बियरे नमः
जहॉं गाव गाव में पियक्कड करते दंगा
वो भारत देश है मेरा

रोज जप करो. शाम को फुकट मे पिने को मिलेगी या पिलाने पडेगी.
जय दारूमॉं !

**एक क्वार्टर कमी पडते**

*दा रु काय गोष्ट आहे*
*मला अजुन कळली नाही*

*कारण प्रत्येक पिणारा म्हणतो*
*मला काहीच चढली नाही*

*सर्व सुरळीत सुरु असताना*
*लास्ट पॅकपाशी गाडी अडते*

*दर पार्टीच्या शेवटी*
*ऐक क्वार्टर कमी पडते*

*पिण्याचा प्रोग्राम म्हणजे जणु*
*विचारवंतांची गोलमेज*

प्रसिद्धी : *परिवर्तनाचा वाटसरू*, ईदिपावली अंक 2005, पान 75 ते 103, संपादक : अभय कांता, पुणे

**''दारु कशी पितात रे भाऊ ?'' अर्थात मद्यपानाची आचारसंहिता**

श्रीनिवास हेमाडे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर 422 605 जिल्हा : अहमदनगर
संपत्र पत्ता : madshri@hotmail.com, दुरून संपर्क : 9226563052



*परिषदच भरते*
*रात्री दिलेला शब्द प्रत्येकजण*
*सकाळच्या आत विसरते*

*मी इतकीच घेणार असा*
*प्रत्येकाचा ठरलेला कोटा*
*असतो*
*पॅक बनवणारा त्यदिवशी*
*जग बनवणाऱ्यापेक्षा मोठा*
*असतो*

*स्वतःच्या स्वार्थासाठी*
*प्यायच्या आग्रहाचे कार्य घडते*
*दर पार्टीच्या शेवटी*
*एक क्वार्टर कमी पडते*

*पिण्याचा कार्यक्रम म्हणजे*
*पिणाऱ्याला दरवेळेस नवीन पर्व*
*असतो*
*लोकांना अकॅडेमीक्सपेक्षा*
*पिण्याच्या क्षमतेवर गर्व असतो*

*आपण हीच घेतो म्हणत*
*ऐकमेकाचे ब्रॅंडप्रेम जागवतात*

*वेळ आली आणि पैसा नसला की*
*देशीवरही तहान् भागवतात*

*शेवटी काय दारु दारु असते*
*कोणतीही चढते*
*दर पार्टीच्या शेवटी*
*ऐक क्वार्टर कमी पडते*

*पिणाऱ्यामध्ये प्रेम हा*
*चर्चेचा पहिला विषय आहे*
*देवदासचे खरे प्रेम पारो की दारु*
*मला अजुन संशय आहे*

*प्रत्येक पॅकमागे तिची*
*आठवण दडली असते*
*हा बाटलीत बुडला असतो*
*ती चांगल्या घरी पडली असते*

*तिच्या आठवणीत थर्टीची लेवल*
*लगेच सिक्स्टीला भिडते*
*दर पार्टीच्या शेवटी*
*ऐक क्वार्टर कमी पडते*

*चुकुन कधीतरी गंभीर*
*विषयावरही चर्चा चालतात*
*सर्वेजण मग त्यावर*
*PH. D. केल्यासारखे बोलतात*

*प्रत्येकाला वाटते की त्यालाच*
*यामधले जास्त कळते*
*ग्लोबल वार्मिंगची चर्चा*
*गावच्या पोटनिवडणुकीकडे*
*वळते*

*जसा मुद्दा बदलतो*
*तसा आवाज वाढते*
*दर पार्टीच्या शेवटी*
*ऐक क्वार्टर कमी पडते*

*फेकणे, मोठेपणा दाखवणे*
*याबाबतीत् यांच्यासारखा हात*
*नाही*
*एरवी सिंगल समोसा खाणारा*
*गोष्टीत पीझ्झाशीवाय् खात नाही*

*पैशे पैशे काय आहे ते फक्त*
*खर्च करासाठीच असतात*
*पॅकजवळ झालेली अशी गणिते*
*सकाळी चहाच्या कटींगपाशी*
*फसतात*

*रात्री थोडी जास्त झाली*
*मग त्याला कळते*
*दर पार्टीच्या शेवटी*
*ऐक क्वार्टर कमी पडते*

*यांच्यामते मद्यपान हा*
*आयुष्याचा महत्वाचा पार्ट आहे*
*बियर पिण्यामागे सायन्स*
*तर देशी पिण्यामागे आर्ट आहे*

*यामुळे धीर येते ताकत येते*
*यात वेगळीच मजा असते*
*आयुष्याभराचा मावळा माणुस*
*त्या क्षणी राजा असते*

*दारुमुळे आपल्याला घराच्या*
*चिवड्याचे महत्व कळते*
*दर पार्टीच्या शेवटी*
*ऐक क्वार्टर कमी पडते*